मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २६५ ■ सोमवार, ०८ जून २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514



# राज्यात मानसिक आरोग्य सेवांचे जाळे अधिक मजबूत करणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** राज्यातील ग्रामीण आणि आदिवासी भागांपर्यंत मानसिक आरोग्य सेवा प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, नागपूर आणि वर्धा जिल्ह्यांमध्ये ‘उडान’ प्रकल्पांतर्गत मानसिक आरोग्य सेवा अधिक बळकट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने सार्वजनिक आरोग्य विभाग आणि दोन स्वयंसेवी संस्थांमध्ये पाच वर्षांसाठी सामंजस्य करार करण्यास मंजुरी दिली आहे.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार, ग्रामीण आदिवासी समाज विकास संस्था, सौसर (मध्य प्रदेश) आणि अन्यथा फाउंडेशन या संस्थांच्या सहकार्याने जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. हा करार १ ऑगस्ट २०२६ ते ३१ जुलै २०३१ या कालावधीसाठी लागू राहणार असून, तो पूर्णपणे गैरवित्तीय स्वरूपाचा असल्याने राज्य शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही.

राज्यात मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत्या प्रमाणात समोर येत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. राष्ट्रीय मानसिक आरोग्य आणि मेंदू विज्ञान संस्थेच्या सर्वेक्षणानुसार देशातील सुमारे १० ते १४ टक्के प्रौढ व्यक्तींना मानसिक आरोग्याचे विकार आहेत. महाराष्ट्राची लोकसंख्या लक्षात घेता सुमारे १.२ ते १.८ कोटी नागरिक मानसिक समस्यांशी झुंज देत असल्याचे या सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात आरोग्य सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देत मानसिक आरोग्याला प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारले आहे. ग्रामीण भागात मानसिक आरोग्य सेवा अधिक परिणामकारकपणे उपलब्ध व्हाव्यात यासाठी ‘उडान’ प्रकल्पाचा विस्तार करण्यात येत आहे.

या प्रकल्पांतर्गत गावपातळीवर मानसिक आरोग्य जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असून ग्रामपंचायत, बचत गट, युवक गट यांचा सहभाग वाढविला जाणार आहे; तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर मानसिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, मनुष्यबळ प्रशिक्षण, मातृ मानसिक आरोग्य कार्यक्रम राबविणे, तसेच सौम्य आणि मध्यम स्वरूपाच्या रुग्णांना मानसोपचार व समुपदेशन सेवा देण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.याआधी नागपूर जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या ‘उडान’ प्रकल्पाला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर आता वर्धा जिल्ह्यातही हा कार्यक्रम विस्तारित करण्यात येत आहे. यामुळे ग्रामीण आणि आदिवासी भागातील नागरिकांना मानसिक आरोग्य उपचार आणि समुपदेशन सेवा स्थानिक स्तरावर उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.सार्वजनिक आरोग्य विभागाने या करारासाठी आरोग्य सेवा संचालकांना अधिकृत केले असून, मानसिक आरोग्य क्षेत्रात शासन आणि स्वयंसेवी संस्थांमधील समन्वयातून राज्यातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न आहे.

## अभिनव प्रतिष्ठान'तर्फे वन अधिकारी अनिल पाटील व पत्रकार योगेश पालोदकर 'अभिनव गौरव' राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड येथील 'अभिनव प्रतिष्ठान'च्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण संवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव सोहळा संस्थेच्या कार्यालयात नुकताच संपन्न झाला.





या कार्यक्रमात सामाजिक वनीकरण विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी अनिल पाटील यांना 'राज्यस्तरीय निसर्ग संवर्धक पुरस्कार - २०२६ ' आणि 'दै. युवक आधार'चे जिल्हा प्रतिनिधी व 'न्यूज २९ महाराष्ट्र'चे तालुका प्रतिनिधी योगेश पालोदकर यांना स्व. पत्रकार राजेश भैय्या चौबे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ 'राज्यस्तरीय अभिनव गौरव पर्यावरण स्नेही पत्रकार' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

वनपरिक्षेत्र अधिकारी अनिल पाटील यांनी सिल्लोड कार्यकाळात एक लाखांहून अधिक रोपांची लागवड करून निसर्ग रक्षणाचे लक्षवेधी कार्य केले आहे. राज्यपुष्प 'जारूळ-तामण' संवर्धन आणि लष्कराच्या 'ग्रीन बटालियन'सोबत वन्यजीव रक्षणार्थ दिलेले योगदान राज्यासाठी दिशादर्शक ठरले आहे. तसेच, ग्रामीण भागात पर्यावरण विषयावर सातत्याने वार्तांकन, नदी स्वच्छतेच्या कार्यात प्रत्यक्ष सहभाग आणि अवैध वृक्षतोड थांबविण्यासाठी दिलेल्या लेखणीच्या बळाबद्दल पत्रकार योगेश पालोदकर यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि मानाचा शेला असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

हा कार्यक्रम 'सूर्यकिरण अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक' आणि 'अभिनव प्रतिष्ठान'च्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी संस्थेचे अध्यक्ष किरण पवार, पत्रकार सचिन चौबे, वैद्यकीय अधिकारी डॉ. पांडुरंग चौधरी, नगरसेवक सुनील दुधे, आदर्श शिक्षक संजय बागुल, बँकेचे सरव्यवस्थापक विजय चव्हाण, व्यवस्थापक दीपक पाटील, राजेंद्र चोपडे, प्रशांत गायकवाड, काकासाहेब वाढेकर, बाबुराव चव्हाण, कृष्णा महाजन, महेश पाटील, उमाकांत कुलकर्णी, संदिप पंडित आणि गोपाल गाढवे आदी मान्यवर उपस्थित होते.

### संकटग्रस्त 'वरुण' वृक्षाचे रोपण

**कार्यक्रमाच्या उत्तरार्धात मान्यवरांच्या हस्ते 'वरुण' या वृक्षाचे रोपण करण्यात आले. या वृक्षाचे महत्त्व विशद करताना संशोधक डॉ. संतोष पाटील म्हणाले की, हा वृक्ष 'आययूसीएन' च्या यादीत संकटग्रस्त व दुर्मिळ प्रजातीत मोडतो. पावसाची देवता इंद्र देवाचा प्रिय वृक्ष म्हणून याला विशेष धार्मिक महत्त्व आहे. हा वृक्ष मधमाशा आणि फुलपाखरांसाठी अत्यंत उपयुक्त असून, भविष्यात विविध धार्मिक स्थळांच्या परिसरात अशा रोपांची लागवड करण्यात येणार आहे.**

## खांडवी-परतूर रोडवरील लेंडी पुलावर खड्ड्यांचे साम्राज्य

### यंत्रणेचे दुर्लक्ष; प्रवाशांचे हाल

**दैनिक युवक आधार**

**परतूर- जालना (अशोक ठोके) :** खांडवी ते परतूर दरम्यानच्या मुख्य रस्त्यावरील लेंडी पुलावर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालक आणि पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. गेल्या काही दिवसांपासून पुलाच्या मधोमध आणि दोन्ही बाजूंना खोल खड्डे निर्माण झाले असून, रात्रीच्या वेळी तर अपघाताची शक्यता अधिक वाढली आहे.



दररोज शेकडो दुचाकी, चारचाकी वाहने आणि अवजड मालवाहू ट्रक या पुलावरून ये-जा करतात. खड्डे चुकवताना अचानक ब्रेक लावल्याने अनेक लहान-मोठे अपघात घडले आहेत. पावसाळा तोंडावर आल्याने पाणी साचून खड्डे आणखी धोकादायक होतील, अशी भीती स्थानिक व्यक्त करत आहेत.

स्थानिक नागरिकांनी वारंवार सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रारी केल्या, मात्र अद्याप दुरुस्तीची कोणतीही कार्यवाही झालेली नाही. लेंडी पुल हा खांडवी,परतूर,वाटूर, सातोना,सेलू, परतूरला तसेच आजूबाजूच्या खेडेपाड्यांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. शाळकरी मुले, शेतकरी आणि व्यापाऱ्यांना याचा मोठा फटका बसत आहे.त्यामुळे लेंडी पुलासह संपूर्ण खांडवी-परतूर रस्त्यावरील तातडीने खड्डे बुजवून कायमस्वरूपी डांबरीकरण करावे,अशी जोरदार मागणी नागरिकांमधून होत आहे.प्रशासनाने त्वरित दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिकांनी दिला आहे.

## खासदार क्रीडा महोत्सव 2026 : लाखनीच्या प्रथम अर्पित गुप्ता यांचे बुद्धिबळ स्पर्धेत विजेतेपद



**दैनिक युवक आधार**

**भंडारा भावेश धंधुकियां जिल्हा प्रतिनिधी** : नागपूर येथे खासदार क्रीडा महोत्सव 2026 अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या बुद्धिबळ स्पर्धेत लाखनी येथील बुद्धिबळपटू प्रथम अर्पित गुप्ता यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत एकूण 449 स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या सामन्यांनंतर प्रथम अर्पित गुप्ता यांनी विजेतेपद मिळवले.

यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रथम अर्पित गुप्ता यांचा ट्रॉफी व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

तसेच त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.प्रथम अर्पित गुप्ता यांच्या या यशामुळे लाखनी परिसरात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## नगरसेवक दशरथ म्हात्रे यांच्या पुढाकारातून ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटप

**दैनिक युवक आधार**

**खांदा कॉलनी, पनवेल (प्रतिनिधी):** भारतीय जनता पक्षाच्या वतीने खांदा कॉलनी येथील खांदेश्वर परिसरात ज्येष्ठ नागरिकांसाठी छत्री वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीचा विचार करून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाला पनवेल महानगरपालिकेचे माजी महापौर नितीन (भाई) पाटील, खांदा कॉलनीचे नगरसेवक एकनाथ (दादा) गायकवाड, भाजपा युनियन लीडर मोतीराम कोळी, भाजपा नेते मुंडे साहेब, उद्योजक सुरेश म्हात्रे, बिल्डर संजय पाटील प्रसन्ना, जयंती प्रसन्ना, गोपीनाथ मुंडे, आशा मुंडे,प्रमोद भोईर, रामनाथ पाटील, सुभाष गावडे, दत्ता कुळकर्णी, केबीसी चे महेन्द्र कांबळे, प्रकाश जाधव, अनिल पालवे, शिवाजी खताळ, आझाद जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष कृष्णा पाटील, जेष्ठ नागरिक कट्टा ग्रुप, मी उपनगराध्यक्ष गणेश पाटील, संजय कांबळे,प्रविण भोसले, सचिन गायकवाड, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



खांदेश्वर मंदिर परिसर हा खांदा कॉलनीतील ज्येष्ठ नागरिकांसाठी एक महत्त्वाचे केंद्र मानले जाते. दररोज सकाळी येथे शेकडो ज्येष्ठ नागरिक योगाभ्यास, व्यायाम आणि प्रातःभ्रमणासाठी एकत्र येतात. तसेच विविध महिला संघटनांतील ज्येष्ठ महिलांनीही या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे परिसरातील नियमितपणे मंदिर परिसरात येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना प्रत्यक्ष भेटून त्यांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले.

उपस्थित नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक करत आयोजकांचे आभार मानले.

भाजपा नगरसेवक दशरथ म्हात्रे यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकारातून हा छत्री वाटप कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

समाजातील ज्येष्ठ नागरिकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.



**पाटोदा तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष तथा सा.शिवसंकेतचे संपादक सचिन गायकवाड यांना अभिष्टचिंतन दिना निमित्त सत्कार करुन शुभेच्छा देताना. पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे, पत्रकार संघाचे सचिव ॲड.महेश बेदरे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती अध्यक्ष अजिज शेख, प्रेस फोटोग्राफर तालुकाध्यक्ष सखाराम भोसले, प्रेस फोटोग्राफर कार्याध्यक्ष राहुल सोनवणे, नाभिक संघटनेचे तालुकाध्यक्ष जितेंद्र सांगळे, नदिम भाई शेख, मनोज कदम व बंडू तरटे**

**(छाया- दैनिक युवक आधार पाटोदा.)**

## दुकानातून भांड्यांची चोरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** तीन अनोळखी महिलांनी दुकानाच्या शटरचे लॉक तोडून 31 हजार आठशे रुपये किमतीची भांडी चोरून नेल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात पाच जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. गौरव पवार हे पिसार्वे, तळोजा येथे राहत असून त्यांच्या स्काय लाईन सफायर सोसायटी, तळोजा फेस वन येथील दुकानाचे शटरचे लॉक तीन अनोळखी महिलांनी तोडले. आणि आतमध्ये प्रवेश करून 31 हजार आठशे रुपयांची भांडी चोरून नेली.

# सय्यद अकबर यांच्या मार्गदर्शनाखाली फळ झाडांचे वृक्षारोपण

## ' एक पेड माँ के नाम' अभियानांतर्गत केले तक्का येथे फळझाड वृक्षारोपण

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टीच्या वतीने पर्यावरण संवर्धन हा मुद्दा केंद्रस्थानी ठेवून जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने देशभरात वृक्षारोपण अभियान साजरे केले गेले." एक पेड माँ के नाम" या शीर्षकाखाली राबविलेल्या या अभियानामध्ये अल्पसंख्यांक समाजाने हिरीरीने सहभाग घेतला. भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा कोकण प्रदेश सहसंयोजक सय्यद अकबर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या कार्यक्रमात अल्पसंख्यांक बांधवांनी जागोजागी फळझाडांचे रोपण करत या अभियानात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.







५ जून रोजी पनवेल महानगरपालिका हद्दीतील अत्यंत प्रतिष्ठित तसेच विकसनशील समजल्या जाणाऱ्या तक्का परिसरामध्ये हे अभियान राबविण्यात आले. पनवेल रेल्वे स्थानकापासून हाकेच्या अंतरावर असणारा तक्का परिसरातील हजरत पीर जमाल शाह बाबा दर्गा हा हिंदू- मुसलमान ऐक्याचे ऐतिहासिक प्रतीक आहे. या दर्गा परिसरातील कब्रस्तान मध्ये सीताफळ, पेरू, जांभूळ यासारख्या फळझाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी येथील मदरशामध्ये शिकत असणाऱ्या लहान मुलांनी या वृक्षारोपण अभियानामध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.या वृक्षारोपण कार्यक्रमाला पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते प्रकाश बिनेदार, भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा कोकण सहसंयोजक सय्यद अकबर, नगरसेवक अजय बहिरा, मौलाना नईम शेख, दर्ग्याचे विश्वस्त सिझान जावेद फकीर मुजावर, अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश सदस्य साबीर शेख, राहुल बोर्डे, मुदस्सर पटेल, आफताब ताडे, अयुब पठाण,असिफ काझी यांची प्रमुख उपस्थिती होती.

वृक्षारोपणानंतर आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना धर्मगुरू मौलाना नईम शेख म्हणाले की अल्लाह यांनी आपल्याला नेहमीच वृक्षारोपणाची शिकवण दिलेली आहे. पृथ्वीचे संतुलन राखण्यासाठी अल्लाह ताला यांनी डोंगर आणि झाडांची निर्मिती केली आहे. वृक्षांची कत्तल केल्यामुळेच आज आपल्याला महापूर, भूकंप त्सुनामी सारख्या संकटांना सामोरे जावे लागत आहे. परंतु याच निसर्ग संवर्धनाची गरज लक्षात घेऊन भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा ने जे फळझाडांचे वृक्षारोपण केले आहे ते खरंच कौतुकास्पद आहे. मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून राबविल्या जाणाऱ्या एक पेड मा के नाम! या अभियानाला शुभेच्छा देतो.

आपले मनोगत व्यक्त करताना नगरसेवक अजय बहिरा यांनी सांगितले की कोरोना विषाणूच्या संक्रमणाचा अत्यंत वाईट कालखंड आपण सगळ्यांनी पाहिला. या दरम्यान एक गोष्ट आपल्याला प्रकर्षाने जाणवली की आपल्यासाठी ऑक्सिजन किती महत्त्वाचा आहे. आपण आजारी पडल्यावर वाटेल तेवढे पैसे देऊन हॉस्पिटलमध्ये ऑक्सिजन विकत घेतो परंतु हाच ऑक्सिजन वृक्षराजी नैसर्गिक स्वरूपाने आपल्याला देत असतात याचा आपल्याला विसर पडतो. म्हणून आपण झाडे लावली पाहिजेत आणि लावलेल्या झाडांचे संवर्धन केले पाहिजे.

यावेळी आपली भूमिका उपस्थितांसमोर मांडताना सय्यद अकबर म्हणाले की आज जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने देशभरात लाखो करोडो वृक्षांचे रोपण केले जाणार आहे.

समस्त मानव कल्याणासाठी हे अभियान अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. वृक्षारोपण ही आपली सामाजिक गरज तर आहेच पण त्याहीपेक्षा वृक्ष आपल्याला मानवतेचा संदेश देखील देत असतात. आज आपण फळझाडांचे रोपण केले आहे.

फळझाडे त्यांची रसाळ गोमटी फळे देताना कधीही हा विचार करत नाहीत की त्यांना पाणी किंवा खत हे कुठल्या धर्माच्या माणसाने घातले आहे,

कुठल्या पंथाच्या व्यक्तीने किंवा कुठल्या जातीच्या व्यक्तीने त्यांचे संगोपन केले आहे? ज्या निस्वार्थ भावनेने झाडे आपल्याला फळे देतात त्याच निस्वार्थ भावनेने प्रत्येकाने कार्य केल्यास या जगातील दुरावा संपून जाईल.

> "कुठलेही झाड फळ देताना त्याला पाणी कुठल्या धर्मियाने दिले आहे हे कधीही पहात नाही तसेच आपण देखील कार्य केले पाहिजे
>
> - सय्यद अकबर

### उत्तमरित्या अभियानाचे आयोजन केल्याबद्दल सय्यद अकबर यांचे अभिनंदन – प्रकाश बिनेदार

**यावेळी आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना सभागृह नेते प्रकाश बिनेदार म्हणाले की सय्यद अकबर यांच्या नेतृत्वाखाली एका उत्तमरीत्या आयोजित कार्यक्रमाचा साक्षीदार झाल्याचे सौभाग्य मला प्राप्त झाले आहे. पनवेल महानगरपालिकेच्या वतीने पाचही विभागांमध्ये सकाळपासूनच वृक्षारोपणाचे कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. मागच्या वर्षी प म पा ने ५३ हजार वृक्षांचे रोपण केले होते. यावर्षी आम्ही एक लाख वृक्षरोपण करू असा विश्वास आमचे सहकारी महापौर नितीन भाई पाटील यांनी व्यक्त केला आहे. नुकतेच राज्याच्या अल्पसंख्यांक आयोगाच्या उपाध्यक्षांनी पनवेल महानगरपालिकेला भेट दिली. आम्ही करत असलेल्या कार्याबद्दल त्यांनी आमच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली व नवीन महानगरपालिका असून, ड वर्ग महापालिका असून देखील आम्ही ज्या पद्धतीचे काम करत आहोत ते महाराष्ट्रातल्या बाकीच्या महानगरपालिकांनी केले पाहिजे असे गौरवउद्गार काढले. येथील सर्व सफाई कर्मचाऱ्यांचे पगार त्यांच्या थेट खात्यावर जमा होतात त्यामुळे त्यांना कुठल्याही प्रकारचा त्रास होत नाही.मला सांगायला अभिमान वाटतो की आम्ही तब्बल ५४ सफाई कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची घरे देणार आहोत. तसेच २६ कुष्ठ रुग्णांना देखील आम्ही घरे निर्माण करून देत आहोत.**

---

## शिवसेनेच्या युवासेना पनवेल शहर अध्यक्षपदी कपिल भरत कुरघोडे यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी :** - शिवसेना पनवेल महानगर मधील पनवेल, नवीन पनवेल, खांदा कॉलनी, कामोठे, कळंबोली, खारघर येथील युवासेनेच्या शहर अध्यक्ष, सचिव, समन्वयक, उपाध्यक्ष तसेच महानगर उपाध्यक्ष या पदांच्या नेमणुका युवासेना मध्यवर्ती कार्यालय येथून करण्यात आल्या आहेत.



पनवेल मधील शिवसैनिक कपिल भरत कुरघोडे यांची पनवेल शहर अध्यक्षपदी तर विनीत पाटील यांची शहर सचिव पदी नेमणूक करण्यात आल्याचे युवासेना मध्यवर्ती कार्यालयातर्फे जाहीर करण्यात आले आहे.मूळचे शिवसैनिक व पत्रकार असलेले कै.भरत कुरघोडे यांचे कपिल कुरघोडे हे सुपुत्र असून त्यांचा परिवार देखील शिवसेनेशी फार पूर्वीपासून जोडला गेला आहे. त्यांना मिळालेल्या पनवेल युवासेना अध्यक्षपदामुळे पनवेल मधील शिवसैनिक, युवा शिवसैनिक, कार्यकर्ते यांच्यामधे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्यावर पनवेल मधील शिवसेना, युवासेना, कार्यकर्त्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. यावेळी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## शिवरायांच्या प्रेरणेतून दोडकीचा हरित संकल्प; "एक वाढदिवस – एक वृक्ष" उपक्रमाने वेधले सर्वांचे लक्ष!

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : श्री.छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधत दोडकी येथे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी गावकऱ्यांनी एकत्र येत "एक वाढदिवस – एक वृक्षारोपण व संगोपन" हा पर्यावरणपूरक संकल्प करून एका अभिनव उपक्रमाची सुरुवात केली.



सध्या वाढदिवस साजरा करताना केक कापणे, फटाके फोडणे आणि अनावश्यक खर्च करण्याची प्रथा वाढत असताना, दोडकी गावातील युवकांनी समाजासमोर एक आदर्श निर्माण करत प्रत्येक वाढदिवशी किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा निर्धार व्यक्त केला. या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनास चालना मिळण्याबरोबरच भावी पिढ्यांसाठी हरित वारसा निर्माण होण्यास मदत होणार आहे.

कार्यक्रमादरम्यान गावातील विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. उपस्थितांनी वृक्षांचे महत्त्व, हवामान बदलाची गंभीरता आणि जैवविविधता जपण्याची सामूहिक जबाबदारी याविषयी जनजागृती केली. "झाडे लावा, झाडे जगवा" हा संदेश देत प्रत्येक नागरिकाने पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

गावकऱ्यांनी स्वीकारलेला हा संकल्प केवळ वृक्षारोपणापुरता मर्यादित नसून लावलेल्या प्रत्येक वृक्षाचे संगोपन करण्यावरही भर देण्यात आला. त्यामुळे हा उपक्रम पर्यावरण संवर्धनासाठी प्रभावी ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. शिवराज्याभिषेक दिनी सुरू झालेल्या या हरित अभियानामुळे गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून परिसरातील इतर गावांसाठीही हा उपक्रम प्रेरणादायी ठरत आहे.

या उपक्रमात सुभाष नानवटे, संतोष व्ही. नानवटे, डॉ. योगेश नानवटे, विठ्ठल बोरकर, विकास नानवटे, शंकर बोरकर, पंकज जावळे, अनिल वाघ, विठ्ठल सरोदे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दोडकी गावकऱ्यांनी सुरू केलेल्या या अभिनव उपक्रमाचे परिसरात कौतुक होत असून, इतर गावांनीही या संकल्पनेतून प्रेरणा घेऊन पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

## ड्रिप क्लिनिंगच्या कामांबाबत नागरिकांकडून प्रश्नचिन्ह

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर,(केतन भोज) :** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एन विभागातील विक्रोळी पार्कसाईट,रामनगर,राहूल नगर,डकलाईन,सेवा नगर,भीम नगर मध्ये ड्रिप क्लिनिंगच्या कामांसाठी ठेकेदार संस्थांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे सांगितले जात असले,तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी ड्रिप क्लिनिंगची कामे होताना दिसत नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार "ड्रिप क्लिनिंगसाठी ठेकेदार संस्था नेमली असूनही प्रत्यक्षात कामे दिसत नाहीत.मग ही योजना नेमकी ठेकेदारांसाठी आहे की नागरिकांसाठी?" असा सवाल स्थानिक नागरिकांनी उपस्थित केला आहे.स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार,अनेक भागांमध्ये नाले,गटारे ड्रिप क्लिनिंग संबंधित कामे नियमित विभागात स्वच्छता होत नसल्याने पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर चिंता व्यक्त केली जात आहे.ड्रिप क्लिनिंगसारख्या योजनांवर महापालिकेकडून मोठ्या प्रमाणात खर्च होत असताना त्याचा प्रत्यक्ष फायदा नागरिकांना मिळत आहे का,याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.दरम्यान,या विषयावर मनपा एन विभागाच्या घन कचरा व्यवस्थापन विभागाने संबंधित कामांची माहिती,कामाचे वेळापत्रक तसेच ठेकेदार संस्थांना देण्यात आलेल्या जबाबदाऱ्यांची माहिती सार्वजनिक करावी,अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.पावसाळा तोंडावर असताना ड्रिप क्लिनिंग योजनेच्या संबंधित कामांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याने,प्रशासनाने या तक्रारींची दखल घेऊन वस्तुस्थिती स्पष्ट करावी,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त "एक पेड माँ के नाम" अभियानांतर्गत खांदा कॉलनी येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** मा. विरोधी पक्षनेते श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांच्या हस्ते तसेच महिला बालकल्याण समिती सभापती सौ. ममताताई प्रितम म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

संयोजक : श्री योगेश कोठेकर, उपाध्यक्ष खांदा कॉलनी शहर



या उपक्रमा दरम्यान श्री दशरथ म्हात्रे अध्यक्ष नवीन पनवेल मंडळ, नगरसेवक खांदा कॉलनी,सौ.सीताताई पाटील नगरसेविका खांदा कॉलनी,श्री गणेश पाटील माजी उपनगराध्यक्ष, श्री संजय कांबळे अध्यक्ष प्रभाग क्रमांक 15, श्री गोपीनाथ मुंडे उपाध्यक्ष नवीन पनवेल मंडळ, श्री जयंत भगत, अध्यक्ष व्यापारी सेल नवीन पनवेल, श्री सोनवणे साहेब अनुसूचित जाती अध्यक्ष प्रभाग 15, श्री राजू महापूरकर चिटणीस प्रभाग 15, श्री दीपक जांभळे, सरचिटणीस प्रभाग 15, श्री. रोहित कोळी, उपाध्यक्ष युवा मोर्चा, पंकज धाडी, भद्रा शेट्टी, श्री. गजानन साळवी, सौ. आशाताई मुंडे अध्यक्ष खांदा कॉलनी महिला मोर्चा, सौ. विद्याताई यादव सरचिटणीस महिला मोर्चा, सौ. उर्मिला प्रजापती, अध्यक्ष उत्तर भारतीय महिला मोर्चा, श्री कार्तिक नलया संस्थापक हँड्स ऑफ ट्रस्ट, श्री सचिन शिर्के, श्री विनायक भिसे तसेच सेक्टर 12 मधील रहिवासी पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करत प्रभाग क्रमांक १८ मधील नागरिक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वृक्षारोपण करून हरित भविष्यासाठी आपला सहभाग नोंदविला.

## खरीप हंगाम तोंडावर, पण बळीराजाच्या खिशात खडखडाट !!

### कर्जाचा डोंगर, शेतकरी हवालदिल !!

**दैनिक युवक आधार अकोला**

**दिलीप कराळे/ प्रतिनिधी :** पेरणीपूर्व आलेल्या जोरदार पावसामुळे आता शेतकरी बांधवांची शेतकामांची लगबग सुरू झाली आहे. मात्र यंदाची खरीप पेरणी कशी करावी हा सर्वात मोठा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. निसर्गाचा लहरीपणा, मालाला न मिळालेला अपेक्षित भाव आणि डोक्यावर असलेला कर्जाचा डोंगर या संकटामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे कोलमडला असून पेरणीसाठी पैशांची जुळवाजुळव करताना बळीराजाच्या नाकीनऊ येत आहेत.



गेल्या हंगामात ढग फुटी सदृश झालेल्या पावसामुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले. निसर्गाच्या या लहरीपणामधून जे काही थोडेबहुत पीक शेतकऱ्यांच्या हाती आले, त्याला बाजारात अपेक्षेप्रमाणे भाव मिळाला नाही. कष्टाने पिकवलेल्या मालाला मातीमोल भाव मिळाल्याने जगायचं कसं आणि पुढील हंगामाची तयारी कशी करायची, असा संतप्त आणि उद्विग्न सवाल शेतकरी विचारत आहेत.

शेतकऱ्याची बँकांची जुनी कर्जे अद्याप फिटलेली नसल्याने अनेक शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज मिळण्यात अडचणी येत आहेत. बँकांच्या चक्रात अडकण्यापेक्षा शेतकरी आता हवालदिल होऊन पुन्हा एकदा खाजगी सावकारांच्या उंबरठ्यावर उभा राहताना दिसत आहे. डोक्यावर कर्जाचा डोंगर आधीच असताना, नवीन पेरणीसाठी पुन्हा कर्ज काढण्याशिवाय शेतकऱ्यांसमोर दुसरा कोणताही पर्याय उरलेला नाही.

पेरणीसाठी पैशांची जुळवाजुळव करताना शेतकऱ्यांना कसरत करावी लागत आहे. बाजारपेठेत खते आणि बियाण्यांचे दर गगनाला भिडले आहेत.त्यातच सबसिडी असलेल्या खतांचा नेहमीच तुटवडा , बोगस बियाण्यांचे सावट आणि दुसरीकडे वाढलेली महागाई यामुळे पेरणीचा खर्च दुप्पट झाला आहे. अशा परिस्थितीत खिशात खडखडाट असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी अद्याप शेतजमीन तयार करण्याचे कामही पैशांअभावी थांबवून ठेवले आहे.

अश्या परिस्थिती त सरकारने तातडीने बँकांना कडक निर्देश देऊन पीक कर्जाचे वाटप सुलभ व विनाविलंब करण्याचे कडक निर्देश द्यावेत, त्याचप्रमाणे खते आणि बियाण्यांचा काळाबाजार रोखून ती सर्वच शेतकरी वर्गाला उपलब्ध करून द्यावीत. निसर्गाने साथ दिली तरी व्यवस्थेच्या मारामुळे शेतकरी हतबल झाला आहे. जर सरकारने वेळेत आर्थिक मदत किंवा कर्जपुरवठा केला नाही, तर यंदा राज्यातील अनेक भागांत पेरण्या खोळंबण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन सरकारने तातडीने पावले उचलावीत अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे

"शेतकऱ्याच्या घरात खाण्यापुरतेही पैसे उरलेले नाहीत. बियाणे, खते आणि ट्रॅक्टरच्या भाड्यासाठी पैसे कुठून आणायचे? बँकेत गेले तर जुने कर्ज फेडा म्हणतात. शेतकऱ्यांनी जगायचे की मरायचे, सरकारनेच सांगावे."

# जर्मनीत आंतरराष्ट्रीय स्वाभिमानी मराठा महासंघाचा स्थापना दिवस मोठ्या उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर,(केतन भोज) :** ६ जून रोजी शिवराज्याभिषेक दिन आणि आंतरराष्ट्रीय स्वाभिमानी मराठा महासंघाच्या स्थापना दिनाचे औचित्य साधून महासंघाचे संस्थापक, छत्रपती भूषण, प्रखर मराठा व क्षत्रिय आंदोलक तथा ख्यातनाम व्याख्याते डॉ. कृषीराज टकले पाटील यांच्या मार्गदर्शनाने तसेच जर्मनी येथील रणजित सिंह यांच्या नेतृत्वाखाली भव्य स्वरूपात वर्धापन दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. परदेशातील भूमीवर छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा आणि महासंघाच्या ध्येय-धोरणांचा जयजयकार करत हा वर्धापन दिन अत्यंत दिमाखात साजरा करण्यात आला. यावेळी मराठा महासंघाचा झेंडा जर्मनीमध्ये मोठ्या डौलाने आणि अभिमानाने फडकविण्यात आला. या ऐतिहासिक सोहळ्याला आंतरराष्ट्रीय स्वाभिमानी मराठा महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीतील अनेक प्रमुख पदाधिकाऱ्यांची विशेष उपस्थिती लाभली. जर्मनीमध्ये राहणाऱ्या मराठी आणि भारतीय बांधवांना एकत्र करत रणजित सिंह यांनी या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले होते. याप्रसंगी डॉ. कृषीराज टकले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महासंघाचे कार्य जागतिक पातळीवर विस्तारण्याचा



आणि शिवरायांचा गौरवशाली इतिहास सातासमुद्रापार पोहोचविण्याचा संकल्प करण्यात आला. परकीय भुमीवर पार पडलेल्या या दिमाखदार सोहळयामुळे जगभरातील शिवप्रेमींमध्ये आनंदाचे व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जागतिक स्तरावरील महासंघाच्या या गौरवशाली चळवळीत आणि कार्यात सहभागी व्हायचे असल्यास शिवप्रेमींनी ७५८८११५९३२ या क्रमांकावर 'जय भवानी, जय शिवराय, जय स्वाभिमानी' लिहून आपला सविस्तर परिचय पाठवावा, असे आवाहन महासंघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# ग्रामीण विद्यार्थिनींसाठी सुवर्णसंधी !

## सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृहाची प्रवेश प्रक्रिया सुरू

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थिनींना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने संचालित क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह, सिव्हील लाईन, वाशीम येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी रिक्त जागांवरील प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पात्र विद्यार्थिनींनी वेळेत ऑनलाईन अर्ज सादर करून या सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थिनींचा शैक्षणिक दर्जा उंचावण्याच्या उद्देशाने वसतिगृहामध्ये विविध अत्याधुनिक आणि उपयुक्त सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विद्यार्थिनींना मोफत निवास, भोजन व्यवस्था,




ग्रंथालय, संगणक प्रयोगशाळा, मोफत शैक्षणिक साहित्य, गणवेश, खेळाचे साहित्य तसेच निर्वाह भत्ता यांसारख्या सुविधा दिल्या जात आहेत. त्यामुळे उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींसाठी हे वसतिगृह मोठा आधार ठरत आहे.

प्रवेश प्रक्रियेमध्ये अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ८५ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या असून त्यामध्ये अनाथ विद्यार्थिनींसाठी १ टक्का आणि दिव्यांग विद्यार्थिनींसाठी ५ टक्के समांतर आरक्षणाचा समावेश आहे. तसेच अनुसूचित जमातीसाठी ३ टक्के, विमुक्त जाती व भटक्या जमातींसाठी ५ टक्के, इतर मागास प्रवर्गासाठी ५ टक्के आणि विशेष मागास प्रवर्गासाठी २ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

इच्छुक विद्यार्थिनींनी प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक असून त्यासाठी https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर जाऊन अर्ज भरता येणार आहे. अर्जासोबत मागील शैक्षणिक वर्षाची गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, बोनाफाईड प्रमाणपत्र, आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला, बँक पासबुकची झेरॉक्स प्रत, रहिवासी दाखला, अधिवास प्रमाणपत्र तसेच जात प्रमाणपत्र आदी आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागणार आहेत.

शालेय विद्यार्थिनींसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३० जून २०२६ निश्चित करण्यात आली असून कनिष्ठ महाविद्यालय आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश अर्ज करण्याची अंतिम तारीख १५ जुलै २०२६ आहे. त्यामुळे पात्र विद्यार्थिनींनी शेवटच्या तारखेची वाट न पाहता तात्काळ अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

**अधिक माहितीसाठी संपर्क**

प्रवेश प्रक्रियेबाबत अधिक माहिती जाणून घेण्यासाठी वसतिगृहाचे गृहपाल व्ही. एम. लाकडे यांच्याशी संपर्क साधावा.

संपर्क क्रमांक :
९८३४००५४००
९६२३२२८१७५

"शासनाच्या निवासी व शैक्षणिक सुविधांचा लाभ घेऊन विद्यार्थिनींनी शिक्षणात प्रगती साधावी," असे आवाहन वसतिगृह प्रशासनाने केले आहे.

# अल्पवयीन दुचाकी चालकांवर सोयगाव पोलिसांची धडक कारवाई.. पालकांनाही दिला इशारा

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** वाहतूक नियमांचे पालन व्हावे तसेच वाढत्या अपघातांना आळा बसावा यासाठी सोयगाव पोलीस स्टेशनच्या वतीने अल्पवयीन दुचाकी चालकांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली.छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात नुकतेच सोयगाव पोलीस ठाण्यात रुजू झालेले सहाय्यक उपनिरीक्षक दिनकर गोरे यांच्या नेतृत्वाखाली ही धडक कारवाई करण्यात आली.या मोहिमेदरम्यान अल्पवयीनांकडून चालविण्यात येणाऱ्या दुचाकी वाहनांची कसून तपासणी करण्यात आली. वाहन नोंदणी प्रमाणपत्र (आरसी),विमा, प्रदूषण प्रमाणपत्र (पीयूसी),वाहन परवाना तसेच चालक परवाना



आदी आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.यावेळी वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या हातगाड्यांवालांना इशारा.संबंधित हातगाडी चालकांना रस्त्यावर गाड्या उभ्या करू नयेत, जेणेकरून रहदारीला अडचण होईल.अन्यथा दंडात्मक तसेच कायदेशीर कारवाई करण्यात येईल,अशी ताकीद देण्यात आली.पोलिस प्रशासनाने पालकांना आवाहन केले आहे की, अल्पवयीन मुलांच्या हातात वाहने देऊ नयेत.अल्पवयीन मुलांनी वाहन चालविल्यास केवळ त्यांच्यावरच नव्हे तर पालकांवरही कायदेशीर कारवाई होऊ शकते,असे प्रशासनाने स्पष्ट केले आहेवाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून स्वतःची तसेच इतरांची सुरक्षितता जपावी, असे आवाहनही पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले. दरम्यान,या मोहिमेला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळाल्याचे पोलिसांनी सांगितले.यावेळी धडक मोहिमेत सहभागी पोलीस कॉन्स्टेबल सादिक तडवी, अमोल आतकने, मिर्झा,राजु सोनवणे आदींची उपस्थिती होती.

# देवणी तालुक्यात कुणबी नोंदी शून्य मराठा समाजाला ओबीसी आरक्षणाचा लाभाबाबत प्रश्नचिन्ह

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम :** देवणी तालुक्यात जुनी मराठा कुणबी नोंद अस्तित्वात नसल्याचा दावा पुढे येत असून, उपलब्ध महसूल व ऐतिहासिक नोंदींनुसार तालुक्यातील मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातील कुणबी प्रमाणपत्राचा प्रत्यक्ष लाभ मिळण्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. राज्य शासनाकडून हैदराबाद गॅझेट, जुन्या महसूल अभिलेखांमधील "कुणबी" नोंदी तसेच आठ जिल्ह्यांमध्ये सुमारे ५१ हजार कुणबी नोंदी सापडल्याचे सांगितले जात असले, तरी देवणी तालुक्यात अद्याप एकही स्पष्ट नोंद उपलब्ध नसल्याची चर्चा सुरू आहे.




राज्य शासनाने मराठा समाजासाठी स्वतंत्र प्रक्रिया, एसओपी (Standard Operating Procedure) समिती, तसेच जुन्या नोंदींच्या आधारे कुणबी प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती जाहीर केल्याचे सांगितले जाते. मात्र, देवणी तालुक्यात संबंधित पुरावे, निजामकालीन किंवा महसूल अभिलेखांमध्ये नोंदी उपलब्ध नसल्यास स्थानिक मराठा समाजाला ओबीसी आरक्षणाचा प्रत्यक्ष लाभ मिळणे कठीण ठरू शकते, अशी चिंता व्यक्त केली जात आहे.

तसेच, मराठा आरक्षणाच्या संदर्भात राज्य शासनाने उपोषणानंतर विविध नवीन तरतुदी, समित्या व प्रक्रियांची घोषणा केली आहे. परंतु या तरतुदींचा देवणी तालुक्यातील मराठा समाजाला कितपत फायदा होणार, याबाबत स्थानिक स्तरावर संभ्रमाचे वातावरण आहे.

स्थानिक नागरिकांकडून शासनाने तालुकानिहाय स्पष्ट माहिती जाहीर करावी, कुणबी नोंदींची स्थिती पारदर्शक करावी आणि ज्यांच्याकडे जुने पुरावे नाहीत अशा कुटुंबांसाठी पर्यायी कायदेशीर मार्ग स्पष्ट करावेत, अशी मागणी होत आहे.

# नद्या आटल्या, पनवेल तालुक्यात पाणीटंचाई कायम

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पनवेल तालुक्यात गेल्या काही महिन्यांपासून तापमान वाढल्याने पाणीपातळी झपाट्याने घटू लागली आहे. येथील नद्या आटल्याने मोठे संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे अनेकांना विकतच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. 2025 मध्ये जवळपास सहा महिने पाऊस झाला. नोव्हेंबर महिन्यापर्यंत पाऊस असल्याने नदीपत्रांमध्ये अधिक काळ पाणी साचून राहील असा अंदाज वर्तवण्यात आला होता. तसेच थंडीचे वातावरण देखील चांगले असल्याने नद्यांमधील पाणीसाठा टिकून होता. मात्र मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून तालुक्यात तापमान वाढण्यास सुरुवात झाली आणि नद्यांच्या पाणी पातळीत कमालीची घट झाली. त्याची झळ नागरिकांना बसत आहे. सध्या जून महिना उजाडला असून पावसाचा पत्ता नाही. त्यामुळे नद्यांमधील पाणी मोठ्या प्रमाणात आटले आहे. बहुतांश ठिकाणी नदीचे पात्र कोरडे झालेले आहेत. नदीच्या पाणी पातळीवर अनेक गावातील विहिरींची पातळी अवलंबून असते. आदिवासी भागातील विहिरींचे पाणी देखील आटले आहे. अनेक



आदिवासी बांधवांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे पिण्याचा पाण्याचा प्रश्न उभा ठाकला आहे.

पनवेल तालुक्यात लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे मात्र त्यांना पाणीपुरवठा करणारी साधने कमी पडत आहेत. काही ठिकाणी खोदण्यात येणाऱ्या बोरवेलला देखील पाणी लागत नाही. तालुक्यातील अनेक विहिरी, बोअरवेल आणि नद्या कोरड्या पडल्याने नागरिकांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. तर काही ठिकाणी स्थानिकांना पहाटे इतर भागातून पाणी आणावे लागत असून काहींना पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. त्यामुळे पाऊस कधी पडणार आणि पाण्याची टंचाई कधी दूर होणार या विवंचनेत नागरिक आहेत.

# शिवराज्याभिषेक दिनी दोडकीचा हरित संकल्प; "एक वाढदिवस – एक वृक्ष" अभियानाची जोरदार सुरुवात!

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधत दोडकी येथे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी गावकऱ्यांनी एकत्र येत "एक वाढदिवस – एक वृक्षारोपण व संगोपन" हा पर्यावरणपूरक संकल्प करून एका अभिनव उपक्रमाची जोरदार सुरुवात केली.

सध्या वाढदिवस साजरा करताना केक कापणे, फटाके फोडणे आणि अनावश्यक खर्च करण्याची प्रथा वाढत असताना, दोडकी गावातील युवकांनी समाजासमोर एक आदर्श निर्माण करत प्रत्येक वाढदिवशी किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा निर्धार व्यक्त केला. या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनास चालना मिळण्याबरोबरच भावी पिढ्यांसाठी हरित वारसा निर्माण



होण्यास मदत होणार आहे.

कार्यक्रमादरम्यान गावातील विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. उपस्थितांनी वृक्षांचे महत्त्व, हवामान बदलाची गंभीरता आणि जैवविविधता जपण्याची सामूहिक जबाबदारी याविषयी जनजागृती केली. "झाडे लावा, झाडे जगवा" हा संदेश देत प्रत्येक नागरिकाने पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनी सुरू झालेला हा उपक्रम गावासाठी अभिमानास्पद ठरत असून सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरणप्रेम यांचा सुंदर संगम असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. वाढदिवसासारख्या वैयक्तिक आनंदाच्या क्षणाला पर्यावरण संवर्धनाशी जोडण्याचा हा प्रयत्न परिसरातील इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

> **"वाढदिवस हा केवळ आनंद साजरा करण्याचा दिवस नसून समाज आणि पर्यावरणाप्रती आपली जबाबदारी पार पाडण्याची संधी आहे. प्रत्येकाने आपल्या वाढदिवशी एक वृक्ष लावून त्याचे संगोपन केले, तर भविष्यातील पिढ्यांसाठी हिरवागार आणि समृद्ध वारसा निर्माण होऊ शकतो."**
>
> **– दोडकी ग्रामस्थं.**

या उपक्रमात सुभाष नानवटे, संतोष व्ही. नानवटे, डॉ. योगेश नानवटे, विठ्ठल बोरकर, विकास नानवटे, शंकर बोरकर, पंकज जावळे, अनिल वाघ, विठ्ठल सरोदे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दोडकी गावकऱ्यांनी सुरू केलेल्या या अभिनव उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत असून, इतर गावांनीही या संकल्पनेतून प्रेरणा घेऊन पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# तहसीलदार प्रशांत बेडसे यांचा मोठा कायदेशीर विजय

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** शासकीय कर्तव्य बजावत असताना प्रामाणिक अधिकाऱ्यांना विनाकारण वेठीस धरणाऱ्या, ब्लॅकमेल करणाऱ्या 'भुरट्या' माहिती अधिकार कार्यकर्त्यांना आणि खोट्या तक्रारदारांना राजगुरुनगर (खेड) चे विद्यमान तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी उच्च न्यायालयाच्या माध्यमातून एक सणसणीत कायदेशीर चपराक लगावली आहे.

उच्च न्यायालयाच्या मुंबई-नागपूर खंडपीठाने सुट्टीच्या दिवशी (शनिवारी) या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून विशेष तातडीची सुनावणी घेत, बेडसे यांच्यासह इतर अधिकाऱ्यांवर एफआयआर दाखल करण्याच्या वरोरा न्यायालयाच्या आदेशाला तत्काळ स्थगिती दिली आहे.

या निर्णयामुळे प्रशासनात काम करणाऱ्या प्रामाणिक अधिकाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, विनाकारण त्रास देणाऱ्या प्रवृत्तींना एक भक्कम जरब बसली आहे. भ्रष्टाचार आणि फसवणुकीच्या (४२०) गुन्ह्यांखाली शासन सेवेतून बडतर्फ करण्यात आलेला तलाठी विनोद खोब्रागडे यांनी वरोरा येथील न्यायदंडाधिकारी न्यायालयात अधिकाऱ्यांविरुद्ध तक्रार दाखल केली होती.

तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी



तत्काळ उच्च न्यायालयात धाव घेतली. प्रकरणाचे गांभीर्य आणि एका राजपत्रित वर्ग १ अधिकाऱ्याविरुद्ध झालेला कायद्याचा गैरवापर पाहून, उच्च न्यायालयाच्या 'व्हेकेशन बेंच'ने शनिवारी सुट्टी असतानाही यावर तातडीची सुनावणी घेतली. वरोरा न्यायालयाने पारित केलेला आदेश हा नैसर्गिक न्यायाला धरून नसून, तो 'अधिकारक्षेत्राच्या बाहेर' आणि 'एकतर्फी' असल्याचे निरीक्षण नोंदवत उच्च न्यायालयाने त्या आदेशाला तत्काळ स्थगिती दिली.

बडतर्फ तलाठी विनोद खोब्रागडे यांनी न्यायालयाची फसवणूक केल्याप्रकरणी जबाबदारी निश्चित करून गुन्हा दाखल करण्याची न्यायालयीन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सत्य लपवून अधिकाऱ्यांना त्रास देणाऱ्या प्रवृत्तींना कायद्याचा बडगा काय असतो, हे या निमित्ताने स्पष्ट झाले आहे. बेडसे यांनी सांगितले.

या सुनावणीदरम्यान तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी केवळ स्वतःची बाजू मांडली नाही, तर संपूर्ण शासन व्यवस्थेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने एक अत्यंत महत्त्वपूर्ण मागणी न्यायालयासमोर ठेवली. "शासकीय काम करणाऱ्या प्रामाणिक अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध अशाप्रकारे भविष्यात कोणतेही अन्यायकारक आणि एकतर्फी आदेश पारित होऊ नयेत, यासाठी सन्माननीय न्यायालयाने कायमस्वरूपी मार्गदर्शक तत्त्वे व आदेश पारित करावेत," अशी ठाम विनंती त्यांनी केली आहे.

**पत्ता बदल**

**आशीर्वाद मायक्रो फायनान्स लिमिटेड, परतूर**
**सर्व ग्राहकांना सूचित करण्यात येत आहे की, आमचे कार्यालय आता नविन ठिकाणी स्थलांतरित करण्यात येत आहे.**
**पत्ता : साई नगर, ज्ञानलता इंग्लिश स्कूल समोर, परतूर, तालुका परतूर,जिल्हा जालना. अनुज निवास श्री. शिवहरी डोळे यांच्या घरी**
**मो.9637527238**

# विवेकानंद विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार :** शहरातील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित विवेकानंद प्राथमिक विद्यालयात हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक सोहळा दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.यावेळी काशिनाथ पांचाळ, चंदू कव्हळे, मंगेश खरात यांची उपस्थिती होती.



# सोशल वेल्फेअर क्लब वर छापा, आठ जणांविरोधात गुन्हा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** सोशल वेल्फेअर क्लबमध्ये बेकायदेशीररत्या तीन पत्ती जुगार खेळण्यासाठी जागा उपलब्ध करून दिल्या प्रकरणी 8 जणांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात 5 जून रोजी गन्हा दाखल करण्यात आला.जनता मित्र मंडळ सोशल वेल्फेअर क्लबमध्ये तीन पत्ती जुगार खेळला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी सुनील खंडेराव देशमुख (भिलवाडी महाड) शरद विश्राम कळंबकर (भिलवाडी महाड) शैलेश दिनेश पांडे (भिंगारी), राहुल कुमार दिनेश शहा (भिंगारी), शामसुंदर सियाराम सिंग (भिंगारी), किराणा रुद्राप्पा चौधरी (भिंगारी), जितू कुमार (सेवा देणारा) आणि भोजूबाब संजन (मॅनेजर) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. यावेळी पाच हजार तीनशे रुपये जप्त करण्यात आले.

# अडतीस लाख तीस हजारांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** व्हाट्सअप द्वारे संपर्क साधून एका कंपनीचा मालक असल्याचे भासवून मेसेज केले आणि 38 लाख 30 हजार रुपये बँकेत पाठवण्यास सांगून फसवणूक केल्या प्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात चार जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. हितेश दहिवलीकर हे नेरळ, कर्जत येथे राहत असून त्यांच्याकडील मोबाईल मध्ये ताराचंद इंडस्ट्रीचे मालक हिमांशू अगरवाल यांचा मोबाईल क्रमांक सेव आहे. त्यांच्या व्हाट्सअपला ताराचंद कंपनीचा लोगो आहे. तोच लोगो वापरू हितेश दहिवलीकर त्याच्या मोबाईलमध्ये हिमांशू सर याच्या नावाने दुसरा मोबाईल क्रमांक सेव करून ती व्यक्ती हिमांश अग्रवाल हेच मेसेज करत असल्याचे भासवले. आणि फिर्यादी याचा विश्वास संपादन करून अडतीस लाख तीस हजार रुपये बँकेत पाठवण्यास सांगितले आणि मोबाईल क्रमांक वरील अज्ञात इसमाने व्हाट्सअप द्वारे संपर्क करून फसवणूक केली.

# पेट्रोल-डिझेल बचतीसह पर्यावरण संवर्धनाचा संदेश; वाशिममध्ये जागतिक सायकल दिनानिमित्त भव्य सायकल रॅली!

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी :** वाशिम, ३ जून जागतिक सायकल दिनानिमित्त माय भारत केंद्र वाशिम, युवा कार्यक्रम व खेल मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली भव्य सायकल रॅली उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या 'सायकलचा वापर वाढवा' या आवाहनाला प्रतिसाद देत इंधन बचत, पर्यावरण संवर्धन, ऊर्जा संरक्षण आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी ही जनजागृती रॅली काढण्यात आली.

सकाळच्या प्रसन्न वातावरणात शहरातील विविध भागांतून शेकडो युवक, एनसीसी कॅडेट्स, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक या रॅलीत सहभागी झाले. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून रॅलीची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर बाकलीवाल विद्यालय, पाटणी चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, बसस्थानक मार्गे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयापर्यंत सायकल रॅली काढण्यात आली.

रॅलीदरम्यान "इंधन वाचवा – देश वाचवा", "पर्यावरणाचे रक्षण करा", "सायकल चालवा – आरोग्य जपा" अशा विविध संदेशांद्वारे नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. सध्याच्या वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर सायकलचा वापर वाढविण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. तसेच पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करून देशाच्या परकीय चलनाची बचत करण्याचा आणि ऊर्जा संवर्धनाचा संकल्प करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.




कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रीय छात्र सेनेचे अधिकारी अमोल काळे तसेच माजी राष्ट्रीय युवा कोर व जिल्हा युवा पुरस्कार विजेते प्रदीप पट्टेबहादूर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीला सुरुवात करण्यात आली. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना अमोल काळे यांनी सायकलिंगचे आरोग्यदायी फायदे विषद केले. "निरोगी आयुष्यासाठी नियमित सायकलिंगचा वापर करणे काळाची गरज आहे. सायकल ही केवळ प्रवासाचे साधन नसून ती आरोग्य, पर्यावरण आणि राष्ट्रहित यांचा संगम आहे," असे प्रतिपादन त्यांनी केले.

या उपक्रमात राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी), राजा प्रसेनजीत अल्पसंख्याक शिक्षण बहुउद्देशीय संस्था, नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळाचे स्वयंसेवक तसेच विविध क्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

युवकांच्या सहभागामुळे संपूर्ण शहरात सकारात्मक वातावरण निर्माण झाले होते.

> **जागतिक सायकल दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्यापुरता मर्यादित नसून प्रत्येक नागरिकाने आपल्या दैनंदिन जीवनात सायकलिंगचा समावेश करणे आवश्यक आहे. सायकलचा वापर वाढल्यास प्रदूषण कमी होईल, इंधनाची बचत होईल आणि नागरिकांचे आरोग्य अधिक सक्षम बनेल. विशेषतः युवकांनी सायकलिंगची सवय लावून समाजात आरोग्यदायी संदेश पोहोचवावा.**
>
> **– अमोल काळे**
> **राष्ट्रीय छात्र सेना (NCC) अधिकारी**

हा कार्यक्रम जिल्हा युवा अधिकारी मयुरकुमार गोमरे तसेच कार्यक्रम अधिकारी अनिल ढेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सचिन भगत, संदीप कांबळे, दत्ता मोहळे आणि निलेश खोरणे यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाचे प्रभावी संचालन अनुजा काकडे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रदीप पट्टेबहादूर यांनी मानले.

# अकोला जिल्ह्यात येत्या ५ दिवसांत ७,१०१ मेट्रिक टन युरिया उपलब्ध होणार !!

## शेतकऱ्यांनी चिंता न करण्याचे प्रशासनाचे आवाहन !!

**दैनिक युवक आधार**

**अकोला दिलीप कराळे प्रतिनिधी :** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांना युरिया खताचा तुटवडा भासू नये यासाठी जिल्हा प्रशासन आणि कृषी विभाग सतर्क झाला आहे. प्रशासनाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे येत्या पाच दिवसांत जिल्ह्यात एकूण ७,१०१ मेट्रिक टन युरिया खताचा मोठा साठा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाबरून न जाता गरजेनुसारच खत खरेदी करावे, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

जिल्ह्यात येणारा खत साठा दोन टप्प्यांत उपलब्ध होणार असून, त्याचे नियोजन खालीलप्रमाणे आहे: पुढील ३ दिवसांत येणारा साठा (५,८०१ मे.टन) एनएफएल कंपनी १,९७६ मेट्रिक टन, आरसीएफ कंपनी २,६०० मेट्रिक टन,संरक्षित खत साठा (बफर स्टॉक) एकूण २,४५० मे.टन पैकी १,२२५ मेट्रिक टन त्यानंतर




येणारा साठा नर्मदा बायो केम कंपनी १,३०० मेट्रिक टन.या मुळे खताचा सर्व तालुक्यांना दिलासा मिळणार आहे या मोठ्या खत साठ्यामुळे अकोला जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये युरियाचा पुरवठा सुरळीत होणार आहे. ऐन खरीप हंगामाच्या तोंडावर खत उपलब्ध होत असल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, खताचा तुटवडा होणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

> **जिल्ह्याला मंजूर झालेल्या कोट्यानुसार खतसाठा वेळेत उपलब्ध होण्यासाठी कृषी आयुक्तालय स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. त्यामुळे जिल्ह्यात युरियाचा पुरेसा साठा उपलब्ध राहील. शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवून युरियाची जास्तीची किंवा आगाऊ खरेदी करून साठेबाजी करू नये. आवश्यकतेनुसारच खत खरेदी करावे.**
>
> **— डॉ. तुषार जाधव, कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला**

# सिल्लोडच्या जांभई गावात टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू; तुळसाबाई कोठाळेंच्या पाठपुराव्याला यश

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील जांभई गावात निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर, पंचायत समिती सदस्य सौ. तुळसाबाई अंकुश कोठाळे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. त्यांच्या प्रयत्नांतून गावात टँकरद्वारे पाणीपुरवठा आजपासून सुरू करण्यात आला असून, ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.



जांभई गावातील पाणीटंचाईची समस्या गंभीर होत असल्याचे लक्षात येताच, सौ. तुळसाबाई कोठाळे यांनी पंचायत समिती, तहसील प्रशासन व संबंधित विभागांशी सातत्याने संपर्क साधून पाणीपुरवठा तातडीने सुरू करण्याची मागणी केली होती. नागरिकांची पिण्याच्या पाण्यासाठी होणारी गैरसोय दूर करण्यासाठी त्यांनी उचललेल्या या पुढाकाराचे ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे. या पाठपुराव्यात जिल्हा परिषद सदस्य राधाकृष्ण काकडे, भराडीचे सरपंच रघुनाथ पांडव आणि अंकुश कोठाळे यांनीही महत्त्वपूर्ण सहकार्य केले आहे.

सिल्लोड तालुक्यात ज्या ग्रामपंचायतींनी पाणीपुरवठ्यासाठी प्रस्ताव सादर केले आहेत, त्या सर्व गावांत पंचायत समितीच्या माध्यमातून टँकर सुरू करण्यात आले आहेत. कोणताही भेदभाव न करता गरजू गावांपर्यंत पाणी पोहोचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न पंचायत समिती सिल्लोड करत आहे.

> **"पंचायत समितीकडे प्राप्त होणारे पाणीपुरवठ्याचे सर्व प्रस्ताव आम्ही तात्काळ तहसील कार्यालय, सिल्लोड तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालय, सिल्लोड येथे पाठवून दोन दिवसांच्या आत मंजुरी मिळवून देत आहोत. दोन्ही कार्यालयांकडून उत्तम सहकार्य मिळत असल्यामुळे तालुक्यातील कोणत्याही गावाला पिण्याच्या पाण्याची अडचण निर्माण होणार नाही, याची आम्ही विशेष काळजी घेत आहोत. ग्रामपंचायतींनी पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाल्यास त्वरित प्रस्ताव सादर करावेत."**
>
> **— सौ. अनितताई सुरेश बनकर, सभापती, पंचायत समिती सिल्लोड**

# पनवेल वैश्य वाणी समाज महिला मंडळ आयोजित अधिकमास कार्यक्रम संपन्न



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल : वार्ताहर :** पनवेल तालुका वैश्य वाणी समाज महिला मंडळ यांनी आयोजित केलेला अधिक मास कार्यक्रम खूप मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात वैश्य समाज हॉल, मिरची गल्ली, पनवेल येथे साजरा केला. या कार्यक्रमाचे संपूर्ण श्रेय वैश्य समाज महिला मंडळ ज्येष्ठ कमिटी, रेखा जगे, भारती आंग्रे, माधुरी वाणी, रतिका जगे, रंजना तांबोळी, शुभदा मनोरे, ज्योत्स्ना मनोरे, वैशाली सोनटक्के, पुष्पा आंग्रे यांचे आहे. तसेच वैश्य समाज महिला अध्यक्षा पूजा साखरे व सर्व कमिटी यांचेही या कार्यक्रमात मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रसिका महाजन यांनी केले.

अधिक मास या कार्यक्रमांमध्ये अनेक वरिष्ठांनी हजेरी लावली. वैश्य समाज रायगड जिल्हा महिला अध्यक्षा शामल आंग्रे, पनवेल वैश्य समाज अध्यक्ष सुनील शेटे, वैश्य समाज वधु वर मंडळाचे अध्यक्ष प्रदीप दलाल, प्रवीण जगे, वैश्य समाज शिक्षण कमिटी अध्यक्ष प्रगती दलाल, वैश्य समाज गणपती समिती अध्यक्ष सर्वेश दलाल तसेच वैश्य समाज महिला मंडळ सर्व आजी-माजी अध्यक्ष -उपाध्यक्ष यांनी या कार्यक्रमास हजेरी लावली. या कार्यक्रमासाठी वैश्य वाणी बांधव तसेच 160 ते 170 महिला हजर होत्या. या कार्यक्रमासाठी राजू पाठारे यांनी स्टेजवरील डेकोरेशन, माईक, स्पीकर या सर्वांची व्यवस्था विनामूल्य केली. वैभवी गुजरे यांनीही मोलाचे सहकार्य केले. वैश्य समाज महिला मंडळने या सर्वांचे आभार मानले. तसेच या कार्यक्रमासाठी ममता महेंद्र फक्के, अश्विनी अशोक जगे, अध्यक्ष सुनील शेटे, प्रगती प्रदीप दलाल यांनी देणगी स्वरूपात मदत केली. कार्यक्रम अतिशय उत्कृष्ट पद्धतीने, ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाने आणि कार्यकारणीच्या मदतीने आणि शुभदा मनोरे (चारू मनोरे) यांनी बनवलेल्या जेवणाचा आस्वाद घेत यशस्वीरित्या पार पडला.

# प्रत्येक मतदाराची नोंदणी, आमचे ध्येय!; वाशिम जिल्हा काँग्रेसची बूथस्तरावर रणशिंग फुंकली"

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी :** वाशिम, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीतील त्रुटी दूर करून प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट व्हावे, या उद्देशाने वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने "मतदार यादी विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रम" आढावा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विश्राम भवन, वाशिम येथे पार पडलेल्या या कार्यशाळेला जिल्हाभरातील काँग्रेस पदाधिकारी, तालुका अध्यक्ष, ब्लॉक अध्यक्ष, विविध आघाड्यांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजूभाऊ चौधरी होते. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार अमित झनक तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस दिलीपराव सरनाईक उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून अशोक अमानकर (माजी उपजिल्हाधिकारी) व अतुल अमानकर यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी चंद्रकांत साठे, किसनराव मस्के, परशराम भोयर, दिलीप मोनावले, विजय देशमुख, निलेश कानकिराड, महादेव सोळंके, मधुकर जुमडे, अरविंद लाठीया, डॉ. अशोक खरसडे, अब्दुल राजीक शेख, रामनाथ राठोड, प्रदीप वानखेडे, पिंटू भालेराव, राजू जानीवाले, निर्मल बसंतवाणी, नयन करे, हरीश चौधरी, मनोज गोरे, मधुकर काळे, डॉ. तसलीम शेख, मनोहर तोंडे, सुरेश रत्नपारखी, पीरूभाई बेनीवाले, निवासराव मुसळे, मदन जाधव, विजय कडू, दत्तराव उगले, उज्वल देशमुख, सुभाष देवहंश, अमोल खिल्लारे, विजय ढोबळे, बाळाभाऊ लेम्बळे, बाळाभाऊ रोकडे, गणेश गायकवाड, जावेद भाई लालसापूरावाले, प्रमोद वाघ, विष्णू चंद्रशेखर, दिलीप चव्हाण, डॉ. ए. बी. सूर्यवंशी, अल्ताफ गार्वे, दादाराव इंगोले, विनोद ढोके, विशाल इंगोले, चंदन डुकरे, भारत भगत, दिगंबर सरदार, आनंदा चव्हाण, ॲड. समीर नजीर, सुदाम राठोड, मोहन चौधरी, दत्ता चौधरी, रमेश रामटेके, विजय राठोड, जावेद शेख मुनाफ, शेख मेहबूब, महेश दंडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यशाळेमध्ये मतदार यादीतील नाव वगळणे, नवीन नाव नोंदणी, दुबार नावांची छाननी, मृत मतदारांची नावे कमी करणे तसेच विशेष सखोल पुनर्निरीक्षण मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रत्येक मतदान केंद्रावर बूथ लेव्हल एजंट नेमणे, घरोघरी जाऊन पात्र नागरिकांची नोंदणी करणे आणि मतदार यादीतील त्रुटी तातडीने दूर करणे याबाबत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

> **"एकही पात्र मतदार वंचित राहणार नाही, हा आमचा संकल्प आहे. मतदार यादी विशेष सखोल पुनर्निरीक्षण मोहिमेत काँग्रेसचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते बूथस्तरावर सक्रिय राहून लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठी काम करतील."**
>
> **— राजूभाऊ चौधरी**
> **जिल्हाध्यक्ष, वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटी**

> **"मतदार यादी अचूक आणि सर्वसमावेशक असणे ही लोकशाहीची मूलभूत गरज आहे. प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट व्हावे यासाठी काँग्रेसचा प्रत्येक कार्यकर्ता घरोघरी जाऊन काम करेल. मतदार नोंदणी ही केवळ प्रक्रिया नसून लोकशाही बळकट करण्याचे माध्यम आहे."**
>
> **— आमदार अमित झनक**

प्रमुख मार्गदर्शकांनी लोकशाहीच्या बळकटीसाठी मतदार यादी अचूक असणे आवश्यक असल्याचे सांगत प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या बूथवरील मतदार यादीची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन केले. युवक, महिला आणि नवमतदारांपर्यंत पोहोचून त्यांची नोंदणी करण्यावर विशेष भर देण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

अध्यक्षीय भाषणात राजूभाऊ चौधरी यांनी मतदार यादी ही लोकशाहीचा पाया असल्याचे सांगत काँग्रेसचा प्रत्येक कार्यकर्ता घराघरात जाऊन मतदार नोंदणीचे कार्य करेल, असा विश्वास व्यक्त केला. तर आमदार अमित झनक यांनी प्रत्येक पात्र मतदाराचे नाव यादीत समाविष्ट होण्यासाठी संघटितपणे काम करण्याचे आवाहन केले.

कार्यशाळेला जिल्ह्यातील सर्व काँग्रेसचे पदाधिकारी, तालुका अध्यक्ष, ब्लॉक अध्यक्ष आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दादाराव देशमुख यांनी केले तर डॉ. तसलीम शेख यांनी आभार प्रदर्शन केले.

या कार्यशाळेमुळे जिल्ह्यातील मतदार यादी दुरुस्ती व नवमतदार नोंदणी मोहिमेला अधिक गती मिळणार असून आगामी निवडणुकांच्या दृष्टीने काँग्रेस संघटना बूथस्तरावर अधिक मजबूत होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# सार्वजनिक बांधकाम विभाग सटाणा यांचे अतिक्रमण धारकांना नोटीस

## (७ दिवसात रस्त्यावरील वाहतूक अडथळा दूर करण्याबाबत नोटीसा)

**दैनिक युवक आधार**

**बागलाण प्रतिनिधी -दीपक गायकवाड :** बाभुळणे, आलियाबाद, अजंदे , मुल्हेर, अंतापुर व ताहाराबाद महामार्ग क्रमांक २० अहवा ते संभाजीनगर या रस्त्यालगत विनापरवानगी टपरी, गाळे, घर व इतर अनधिकृत बांधकामे करून अतिक्रमण केल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निदर्शनास आले असून सदर अतिक्रमणामुळे रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा निर्माण झाला असून अपघाताची दाट शक्यता नोटीसत वर्तवण्यात आली आहे.

सदरील अतिक्रमण हे मुंबई हायवे ऍक्ट १९५५ अन्वये काढण्यात येणार असल्याची माहिती समोर येत आहे.अतिक्रमण धारकांना ग्रामपंचायत व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या मार्फत संयुक्तिक नोटीसा बजावण्यात आली असून पोलीस बंदोबस्तात अतिक्रमण हटवणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. तसेच प्रशासनामार्फत सदरचे अतिक्रमण मुदतीनंतर कुठलीही पूर्व सूचना न देता काढून घेण्याची



**नागरिकांमध्ये संभ्रम**

**१. सार्वजनिक बांधकाम विभागाने बजावलेल्या नोटीसित किती अंतर रस्त्याच्या मध्यापासून काढण्यात येईल याचा स्पष्ट उल्लेख नाही.**

**२. रस्त्यालगत असणाऱ्या मिळकती धारकांना बांधकाम करण्यास मज्जाव ? बांधकाम सी.स.मिळकत व अतिक्रमण यांबाबत नागरिकांना प्रश्न कायम .**

नोटीस इंजिनियर शेखर पाटील उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग सटाणा यांच्यामार्फत देण्यात आलीत.

# खडी टाकली, जबाबदारी झटकली! पनवेलकरांच्या जीवाशी खेळ सुरूच

**दैनिक युवक आधार**

**पनवेल दीपक कोळवणकर प्रतिनिधी** : नवीन पनवेल सेक्टर-१६ येथे महानगर गॅसने खोदलेल्या रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम संबंधित ठेकेदाराने केले असले, तरी ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचे प्रत्यक्ष पाहणीत दिसून येत आहे.

रस्त्यावर डांबरीकरण न करता केवळ वरवर खडी टाकून खड्डे बुजवण्याचा प्रकार करण्यात आला आहे. यामुळे दुचाकी, रिक्षा तसेच चारचाकी वाहनचालकांसाठी गंभीर धोका निर्माण झाला आहे. खडी सैल असल्याने वाहन घसरणे, तोल जाणे आणि अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



**प्रमुख प्रश्न :**

खड्डे बुजवण्याची ही अधिकृत पद्धत आहे का?

महानगरपालिकेचे संबंधित अभियंते या कामाची पाहणी करतात की नाही?

ठेकेदाराच्या निकृष्ट कामावर कोणाचे संरक्षण आहे?



पावसाळ्यापूर्वी अशा कामांना मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का?

नागरिकांच्या जीविताची जबाबदारी कोण घेणार?

सध्या रस्त्यावर टाकलेली सैल खडी वाहनचालकांसाठी सापळा ठरत आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतर हीच खडी वाहून जाऊन पुन्हा मोठे खड्डे निर्माण होतील आणि अपघातांची मालिका सुरू होण्याची भीती व्यक्त होत आहे. एकीकडे प्रशासन स्मार्ट सिटी, ई-गव्हर्नन्स आणि विकासाच्या गप्पा मारत आहे, तर दुसरीकडे प्रत्यक्षात नागरिकांच्या जीवाशी खेळ करणारी अशी निकृष्ट कामे सुरू आहेत.पनवेल महानगरपालिका प्रशासनाने आणि संबंधित विभागाने तात्काळ या कामाची चौकशी करून संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी व रस्ता योग्य दर्जाने पुन्हा दुरुस्त करावा, अशी नागरिकांची मागणी आहे."खड्डे बुजवले की फक्त बिल काढले?" हा प्रश्न आता पनवेलकर विचारू लागले आहेत.

# डॉ.गणेश ढवळे यांना प्रतिष्ठित "क्रांतीवीर अशफाक उल्ला खान स्मृती राज्यस्तरीय निर्भीड सामाजिक योद्धा पुरस्कार" जाहीर!

## भ्रष्टाचाराविरुद्ध आणि प्रशासकीय दिरंगाईविरुद्ध रस्त्यावर उतरून संघर्ष करणाऱ्या खंबीर युद्धाचा होणार सन्मान!

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** आपला वैद्यकीय व्यवसाय सांभाळत बीड जिल्ह्यातील स्थानिक समस्यांना वाचा फोडणारे आणि जनसामान्यांच्या न्याय्य हक्कांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करणारे धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते व आंदोलनकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेश कर यांना यंदाचा अत्यंत मानाचा आणि प्रतिष्ठित "क्रांतीवीर अशफाक उल्ला खान स्मृती राज्यस्तरीय निर्भीड सामाजिक योद्धा पुरस्कार-२०२६" जाहीर झाला आहे. 'साप्ताहिक युवा लोकमित्र' वृत्तपत्राच्या ५ व्या वर्धापन दिना निमित्त आणि ६ व्या वर्षात पदार्पण सोहळ्याचे औचित्य साधून 'युवा लोकमित्र परिवार'च्या वतीने या सर्वोच्च सन्मानाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. साप्ताहिक युवा लोकमित्र'तर्फे समाजातील अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या आणि समाजहितासाठी



स्वतःला झोकून देणाऱ्या खऱ्या लढवय्यांचा गौरव केला जातो. यंदाच्या उच्चस्तरीय पुरस्कार निवड समितीने डॉ.गणेश ढवळे यांच्या अष्टपैलू, निर्भीड आणि जनहितैषी आंदोलनात्मक कार्याची या सर्वोच्च सन्मानासाठी एकमुखाने निवड केली आहे. डॉ.गणेश ढवळे हे बीड जिल्ह्यातील एक प्रतिष्ठित वैद्यकीय व्यावसायिक आहेत. मात्र केवळ क्लिनिकपुरते मर्यादित न राहता त्यांनी बीड जिल्ह्यातील स्थानिक पायाभूत समस्या, प्रशासकीय दिरंगाई आणि भ्रष्टाचाराविरुद्ध नेहमीच कडक भूमिका घेत आवाज

**२० जून रोजी भव्य सोहळ्यात वितरण**

**हा दिमाखदार आणि गौरवशाली पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, २० जून-२०२६ रोजी संध्याकाळी ०६:०० वाजता 'ताज पॅलेस', कादरपुरा, बार्शी नाका, बीड येथे अत्यंत उत्साहात पार पडणार आहे. या कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक, प्रशासकीय, शैक्षणिक, आणि वैद्यकीय क्षेत्रातील अनेक दिग्गज व मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्याच गरिमामयी उपस्थितीत डॉ.गणेश ढवळे यांच्या संघर्षमय प्रवासाचा विशेष गौरव करण्यात येईल.**

**डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी डॉक्टर म्हणून रुग्णांची सेवा तर केलीच, पण एक सजग नागरिक आणि आंदोलनकर्ते म्हणून बीड जिल्ह्याला न्याय मिळवून दिला आहे. अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या अशा निर्भीड नेतृत्वाला क्रांतीवीर अशफाक उल्ला खान यांच्या नावाने 'राज्यस्तरीय निर्भीड सामाजिक योद्धा पुरस्कार' देताना युवा लोकमित्र परिवाराला सार्थ अभिमान वाटत आहे."**

**शेख ताहेर जाफर**
**संपादक, साप्ताहिक युवा लोकमित्र, बीड.**

उठवला आहे. सर्वसामान्य नागरिकांचे हक्क अबाधित राहावेत या साठी त्यांनी आज वर अनेक यशस्वी आंदोलने, मोर्चे आणि धरणे आंदोलने केली आहेत.

प्रशासनाला झुकवून जनतेला न्याय मिळवून देणारा एक हक्काचा आणि निर्भीड नेता म्हणून त्यांनी जनमानसात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. या पूर्वी त्यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल 'राज्यस्तरीय मातृभूमी समाजरत्न पुरस्कार', 'मराठा भूषण पुरस्कार' आणि 'समाज भूषण पुरस्कार' अशा अनेक नामांकित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

त्यांच्या याच पुरस्कारांच्या शृंखलेत आता 'युवा लोकमित्र'च्या या अत्यंत मानाच्या आणि तडफदार पुरस्काराची भर पडली आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या वर बीड जिल्ह्यातील विविध सामाजिक संघटना, डॉक्टर मित्र, राजकीय नेते, तरुण वर्ग आणि नागरिक व मित्र परिवाराकडून अभिनंदनाचा उत्स्फूर्त वर्षाव होत आहे.

# गडेगावात जागतिक पर्यावरण दिन उत्साहात; नवीन वन्यजीव कार्यालयाचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**भंडारा स्वप्नील काटवले :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून गडेगाव येथे नवीन राखीव वन्यजीव क्षेत्रीय कार्यालयाचे उद्घाटन, वृक्षारोपण आणि सापांबाबत जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धन आणि वन्यजीव संरक्षणाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

नवीन कार्यरत वन्यजीव वनक्षेत्राधिकारी अपेक्षा शेंडे, ग्रीन नेचर फाउंडेशन (ग्रीन फ्रेंड्स नेचर क्लब, लाखनी) चे कार्यवाह प्रा. अशोक गायधने, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भैय्याजी बावनकुळे, अशोक नंदेश्वर, सरीसृप संशोधक विवेक बावनकुळे, सर्पमित्र पंकज भिवगडे, सौरभ बोरकर, नितीन निर्वाण तसेच वनक्षेत्र सहाय्यक सुनील खांडेकर आणि वन विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी वनक्षेत्राधिकारी अपेक्षा शेंडे यांनी गडेगाव येथील नवीन राखीव वन्यजीव क्षेत्रीय कार्यालय कार्यान्वित झाल्याची घोषणा केली. त्यानंतर 'एक पेड़ माँ के नाम' अभियानांतर्गत कार्यालय परिसरात विविध प्रजातींच्या ३५ वृक्षांचे रोपण करण्यात आले. वृक्षांचे संवर्धन व्हावे यासाठी काही रोपांना संरक्षक कठडेही बसविण्यात आले.

यानंतर ग्रीन नेचर फाउंडेशनच्या वतीने विषारी व बिनविषारी सापांचा परिचय कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रा. अशोक गायधने यांनी चार्ट व छायाचित्रांच्या माध्यमातून सापांबाबतची शास्त्रीय माहिती देत अनेक गैरसमज व अंधश्रद्धांचे निरसन केले. कार्यक्रमात सरीसृप संशोधक विवेक बावनकुळे तसेच सर्पमित्र पंकज भिवगडे, नितीन निर्वाण आणि सौरभ बोरकर यांनी सापांचे पर्यावरणीय महत्त्व, त्यांचे संरक्षण आणि साप आढळल्यास घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भैय्याजी बावनकुळे यांनी पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज अधोरेखित केली. वनक्षेत्राधिकारी अपेक्षा शेंडे, सहाय्यक वनक्षेत्र अधिकारी सुनील खांडेकर आणि अशोक नंदेश्वर यांनीही पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. अशोक गायधने यांनी केले, तर आभार प्रदर्शन सहाय्यक वनक्षेत्र अधिकारी सुनील खांडेकर यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ग्रीन नेचर फाउंडेशनचे कार्यकर्ते वंश फंदे, लक्की चांदेवार, महेश जाधव, आकाश खोजे, अश्विन वासनिक, नीलकमल तायडे, गजानन हात्ते, अमित कुंजाम, सुषमा कापगते, छाया लांजेवार तसेच वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सिल्लोड येथे शिवराज्याभिषेक सोहळा व स्व . इंदुमती आकाते पुण्यस्मरणानिमित्त मोफत नेत्र व आरोग्य शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी :** सिल्लोड येथील 'इंदुमती नेत्रालय व सोनोग्राफी सेंटर'मध्ये स्वर्गीय सौ. इंदुमती पुंडलिकराव आकाते यांच्या ३१ व्या पुण्यस्मरणानिमित्त आणि छत्रपती शिवाजी महाराज शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे यंदाही मोफत नेत्र व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात काचबिंदू, मोतीबिंदू व रेटिना तपासणी करण्यात आली. यात एकूण ९५ रुग्णांची तपासणी करण्यात



आली असून, त्यापैकी २२ रुग्ण काचबिंदू या आजाराचे आढळले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज शिवराज्याभिषेक निमित्त व स्व. सौ. इंदुमती आकाते यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून व अभिवादन करून करण्यात आली.

याप्रसंगी मुरलीधर जंजाळ, गंगाराम मिटकरी, मोहन पाटील, पुंडलिकराव आकाते, डॉ. अभिषेक गोलेच्छा, डॉ. विकास गोठवाल, डॉ. शेखर दौंड, किशोर काकडे, डॉ. संदीप गायकवाड, विशाल फरकाडे, युवराज फरकाडे, डॉ. विनोद लोखंडे, विवेक आकाते व डॉ. विजयमाला आकाते उपस्थित होते.

आरोग्य तपासणी शिबीर यशस्वी करण्यासाठी तालेब पठाण, प्रमोद सिरसाठ, सागर कुदळ, सुनील सिरसाठ, भारती जाधव, आरती जवने व पायल परे सिस्टर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन डॉ. विशाल आकाते यांनी केले.

# कर्तव्यदक्ष पोलीस अधिकाऱ्यांना नागरिकांचा भावपूर्ण निरोप ; शकुराज मंगल कार्यालयात भव्य सत्कार

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ एम डी सुरोशे महागाव :** महागाव परिसरातील नागरिकांच्या वतीने कर्तव्यदक्ष, प्रामाणिक व जनतेशी सुसंवाद ठेवणारे पोलीस अधिकारी श्री. धनराज निळे यांची कळंब येथे बदली झाल्याबद्दल व (पीएसआय) व श्री. अमोल राठोड (एपीआय) यांची स्थानिक गुन्हे शाखा येथे बदली झाल्याबद्दल यांच्या सन्मानार्थ आयोजित भव्य निरोप समारंभ नुकताच शकुराज मंगल कार्यालय येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

आपल्या कार्यकाळात दोन्ही अधिकाऱ्यांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखत जनतेचा विश्वास संपादन केला. जनहिताला प्राधान्य देत केलेल्या कार्यामुळे त्यांनी महागाव परिसरातील नागरिकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे.



त्यांच्या बदलीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या निरोप समारंभास नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी, पत्रकार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून आदरणीय संभाजी दादा नरवाडे, हभप गुरुवर्य तानाजी बापू महाराज, पंजाबराव देशमुख, वनमालाताई राठोड, संजय भगत व गजानन वाघमारे उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून दोन्ही अधिकाऱ्यांच्या कर्तव्यनिष्ठ, प्रामाणिक व लोकाभिमुख कार्याचा गौरव केला. तसेच त्यांच्या भावी सेवाकार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

यावेळी शाल, श्रीफळ, पुष्पहार व स्मृतिचिन्ह देऊन श्री. धनराज निळे व श्री. अमोल राठोड यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. उपस्थित नागरिकांनी त्यांच्या कार्यकाळातील अनुभव कथन करत दोन्ही अधिकाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

सत्काराला उत्तर देताना दोन्ही अधिकाऱ्यांनी महागाव परिसरातील नागरिकांनी दिलेल्या प्रेम, सहकार्य व सन्मानाबद्दल मनःपूर्वक आभार मानले. कार्यक्रमाला पोलीस कर्मचारी, पोलीस पाटील, पत्रकार बांधव तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिकांची लक्षणीय उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन आयोजकांच्या वतीने करण्यात आले.

# "रायगडातील धंदेवाल्यांचे धाबे दणाणले; मुंढेंच्या कारवाईने व्यापाऱ्यांत खळबळ"

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा :** भेसळखोरांसह नियमभंग करणाऱ्या खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर कारवाईचा बडगा तसेच रायगडातील व्यापाऱ्यांत खळबळ व घबराट दिसून येत आहे.अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यभरात सुरू केलेल्या धडक मोहिमेमुळे भेसळखोर, बोगस उत्पादक आणि नियमभंग करणाऱ्या व्यापाऱ्यांचे धाबे दणाणले असतानाच आता त्यांचा मोर्चा थेट वडापाव, समोसा, भजीपाव, सँडविच, भेळवाले आणि इतर खाद्यपदार्थ विक्रेत्यांकडे वळला आहे. खाद्यपदार्थ वर्तमानपत्राच्या कागदात गुंडाळून विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करण्याचे स्पष्ट संकेत FDA ने दिल्याने राज्यभरातील हजारो छोटे-मोठे विक्रेते सतर्क झाले आहेत.राज्यातील बाजारपेठा, बसस्थानके, रेल्वे स्थानके तसेच शहरांतील चौक-चौकात वडापाव, समोसा किंवा भजी वर्तमानपत्रात बांधून देण्याची पद्धत अनेक वर्षांपासून सुरू आहे. मात्र, वर्तमानपत्राच्या शाईमध्ये शिसे (Lead), झिंक (Zinc), कॅडमियम (Cadmium) यांसारखे घातक रासायनिक घटक आढळतात. गरम खाद्यपदार्थ या कागदाच्या संपर्कात आल्यास हे विषारी घटक अन्नात मिसळून मानवी आरोग्यास गंभीर धोका निर्माण करू शकतात. कर्करोग, पचनसंस्थेचे विकार तसेच इतर आरोग्य समस्या उद्भवण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जाते.

FDA कडून यापूर्वीच अशा प्रकारच्या पॅकिंगवर बंदी घालण्यात आली होती. मात्र अनेक ठिकाणी या नियमाचे उघडपणे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास



आल्याने आता त्याची कठोर अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे वर्तमानपत्रात खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या विक्रेत्यांना आता बटर पेपर, फूड-ग्रेड पेपर किंवा अन्य मान्यताप्राप्त पॅकिंग साहित्याचा वापर करणे बंधनकारक ठरणार आहे.

मुंढे यांच्या नियुक्तीनंतर कारवाईचा वेग वाढला

आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाचा पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभरात भेसळखोरांविरोधात अभूतपूर्व मोहीम उघडली आहे. दूध, तेल, मसाले, मिठाई, औषधे तसेच विविध खाद्यपदार्थांमधील भेसळीविरोधात सातत्याने धाडी टाकल्या जात आहेत. अनेक ठिकाणी लाखो रुपयांचा भेसळीचा माल जप्त करण्यात आला असून संबंधितांवर गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत.

नुकत्याच झालेल्या कारवाईत भिवंडी, पालघर आणि मुंबई येथील तीन आस्थापनांवर धाड टाकून तब्बल ८१ लाख रुपयांचा औषधसाठा जप्त करण्यात आला. तसेच सुमारे १ कोटी ३५ लाख रुपये किमतीचा सर्जिकल ग्लोव्हजचा साठा गुणवत्ता चाचणीसाठी प्रतिबंधित करण्यात आल्याने औषध आणि वैद्यकीय साहित्य क्षेत्रातही मोठी खळबळ उडाली आहे.

***रायगडातील व्यापाऱ्यांचे धाबे दणाणले***

तुकाराम मुंढे यांच्या कारवाईच्या धडाक्याचा परिणाम आता रायगड जिल्ह्यातही स्पष्टपणे जाणवू लागला आहे. अलिबाग तालुक्यातील नागाव, चौल, रेवदंडा, मुरुड तसेच किनारपट्टी भागातील अनेक खाद्यपदार्थ विक्रेते, हॉटेल व्यावसायिक आणि इतर व्यापाऱ्यांमध्ये FDA च्या कारवाईची चर्चा रंगू लागली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कोणत्याही क्षणी कारवाई होऊ शकते, या भीतीने अनेकांनी आपल्या व्यवसायातील पद्धती बदलण्यास सुरुवात केली असल्याचे चित्र आहे.विशेषतः पर्यटनस्थळांवरील खाद्यपदार्थ विक्रेत्यांसमोर आता स्वच्छता, सुरक्षित पॅकिंग आणि खाद्यसुरक्षा नियमांचे पालन करणे अपरिहार्य ठरणार आहे. अन्यथा दंड, परवाना निलंबन किंवा फौजदारी कारवाईलाही सामोरे जावे लागू शकते.

**ग्राहकांच्या आरोग्यास प्राधान्य**

FDA च्या या निर्णयामुळे ग्राहकांच्या आरोग्य संरक्षणाला मोठी चालना मिळणार असल्याचे मानले जात आहे. खाद्यसुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करण्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून येत्या काळात राज्यभर तपासण्या अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.भेसळखोर, नियमभंग करणारे व्यापारी आणि ग्राहकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्यांविरोधात तुकाराम मुंढे यांनी उघडलेल्या मोहिमेमुळे अनेकांचे धाबे दणाणले असून "नियम पाळा अन्यथा कारवाईला सामोरे जा" हा स्पष्ट संदेश प्रशासनाने दिला आहे.

# काँग्रेसला मोठा धक्का; साहेबराव कांबळेंसह यवतमाळ जिल्ह्यातील शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**दैनिक युवक आधार**

**मुंबई /प्रतिनिधी :** राज्यभरात शिवसेनेच्या विस्ताराला वेग मिळत असल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले असून यवतमाळ जिल्ह्यात काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. विधान परिषदेचे काँग्रेसचे माजी उमेदवार साहेबराव कांबळे यांच्यासह उमरखेड-महागाव विधानसभा मतदारसंघातील शेकडो पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी रविवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. राज्याच्या कानाकोपऱ्यातून होत असलेल्या पक्षप्रवेशांमुळे शिवसेना आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावरील जनतेचा विश्वास दिवसेंदिवस अधिक दृढ होत असल्याचा दावा यावेळी शिंदे यांनी केला.

प्रवेश सोहळ्यात साहेबराव कांबळे यांच्यासह सूर्यकांता दिंडाळकर, राहुल वानखेडे, प्रफुल्ल खंदारे, विद्यानंद नलावडे, कैलास घोगरे, नामदेवराव शिंगणकर, पंजाबराव भालेराव, रवींद्र जाधव, संतोष चव्हाण यांच्यासह युवक काँग्रेस, महिला आघाडी, खरेदी-विक्री संघ आणि विविध संघटनांमधील अनेक पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. याच प्रसंगी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी यावेळी प्रवेश केला. त्यामध्ये उपनगराध्यक्षांसह विविध पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे.

या प्रसंगी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, साहेबराव कांबळे यांनी विकासाला प्राधान्य देत शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे उमरखेड-महागाव मतदारसंघात शिवसेनेची ताकद आणखी वाढणार आहे. विधानसभा निवडणुकीत तब्बल ९३ हजार मते मिळविणारे साहेबराव कांबळे हे प्रभावी नेतृत्व असून त्यांच्या प्रवेशामुळे पक्ष संघटन अधिक मजबूत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मंत्री संजय राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली साहेबराव कांबळे यांनी विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सहकार्य केले. आता ते शिवसेनेच्या माध्यमातून जनतेसाठी अधिक जोमाने काम करतील, असेही शिंदे यांनी सांगितले.

"संजय राठोड हे पालकमंत्री म्हणून जिल्ह्याच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांच्यासह आता दुष्यंत चतुर्वेदी हेदेखील पक्षाकडून बिनविरोध निवडून आले आहेत. साहेबराव कांबळे यांच्यासारखे तडफदार कार्यकर्ते पक्षात आल्याने त्यांच्या विश्वासाला पात्र ठरण्याचे काम आम्ही करू," असे सांगत शिंदे यांनी यवतमाळ जिल्ह्याच्या विकासासाठी सरकार कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली.

पीक विमा, वीटभट्टी कामगार भगिनींना शासकीय योजनांचा लाभ, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची उभारणी तसेच विविध विकासकामांना गती देण्यासाठी सरकार सकारात्मक भूमिका घेईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

स्थानिक प्रश्न सोडविण्यासाठी पालकमंत्री, आमदार आणि शासन यंत्रणा समन्वयाने काम करेल, असेही ते म्हणाले.

साहेबराव कांबळे यांनी काँग्रेसची विधान परिषदेची उमेदवारी मागे घेऊन शिवसेनेसोबत काम करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना शिंदे म्हणाले की, विकासासाठी एकत्र आलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याला शिवसेना ताकद देईल. शब्दाला जागणारा कार्यकर्ता अशी साहेबराव कांबळे यांची ओळख असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वावर वाढता विश्वास राज्यभरातून प्रवेशाचा ओघ सुरूच, शिवसेनेची ताकद वाढली

शिवसेना हा कार्यकर्त्यांचा पक्ष असून मेहनती कार्यकर्त्यांना पक्षात योग्य मान-सन्मान आणि संधी मिळेल, अशी ग्वाही देताना शिंदे म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे यांचे विचार, हिंदुत्व आणि विकासाचा अजेंडा घराघरात पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करावे.

राज्यभरातून शिवसेनेत होत असलेल्या प्रवेशांचा उल्लेख करताना शिंदे म्हणाले की, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून विविध पक्षांचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी शिवसेनेत येत आहेत. हे पक्षावरील आणि महायुती सरकारच्या विकासकामांवरील वाढत्या विश्वासाचे द्योतक आहे.

विधान परिषद निवडणुकीसंदर्भातील प्रश्नाला उत्तर देताना शिंदे म्हणाले की, विकासाच्या भूमिकेला पाठिंबा देण्यासाठी अनेकांनी सकारात्मक निर्णय घेतला आहे. संबंधित भागाचा विकास व्हावा, तेथील जनतेची कामे मार्गी लागावीत या भावनेतून साहेबराव कांबळे यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे.

महाविकास आघाडीवर टीका करताना त्यांनी सांगितले की, विरोधकांकडे आता कोणतेही ठोस मुद्दे उरलेले नाहीत. महायुतीमध्ये एकवाक्यता असून सर्व १७ उमेदवार दमदारपणे निवडून येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाचा विकास झपाट्याने होत असून विरोधकांकडे मुद्दे नसल्याने केवळ आरोप-प्रत्यारोपांचे राजकारण सुरू असल्याची टीकाही त्यांनी केली.

लाईव्ह कार्यक्रमादरम्यान झालेल्या मृत्यूच्या घटनेबाबत विचारलेल्या प्रश्नावर शिंदे म्हणाले की, पोलीस सखोल चौकशी करत असून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल.मुंबई विमानतळावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या अनावरण कार्यक्रमासंदर्भातील प्रश्नावर उत्तर देताना त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालेला कार्यक्रम हा संपूर्ण सरकारचाच कार्यक्रम होता. विरोधकांकडे कोणतेही प्रश्न नसल्याने ते प्रत्येक विषयाचे राजकारण करण्याचा प्रयत्न करत असल्याची टीकाही त्यांनी केली.

# अमर जवान शहीद कृषी फॉर्म मानेगांव येथे जागतिक पर्यावरण दिन व वृक्षारोपण कार्यक्रम

## ग्रीन नेचर फाउंडेशन व लाखनी वनक्षेत्र कार्यालयाचा संयुक्त उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**भावेश धंधुकिया भंडारा जिल्हा :** येथील ग्रीन नेचर फाउंडेशन अर्थात ग्रीनफ्रेंड्स नेचर क्लब लाखनी व वनक्षेत्र कार्यालय लाखनी यांच्या संयुक्त विद्यमाने मानेगांव बेळा येथील सेलोटी पटाची दान जवळ सेवानिवृत्त मेजर ऋषी वंजारी यांच्याकडून स्थापित अमर जवान शहीद कृषी फॉर्म येथे जागतिक पर्यावरण दिनाचा कार्यक्रम ज्येष्ठ नागरिक भैय्याजी बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली व ग्रीन नेचर फाउंडेशनचे कार्यवाह प्रा अशोक गायधने,वनक्षेत्र सहाय्यक ए. व्हि. बोरकर, जनकासचे वनपाल साखरवाडे , वनरक्षक लखवाल, आर आर टी चे सदस्य मयूर गायधने, अरविंद वरठे, सेवानिवृत मेजर ऋषी वंजारी यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आला.

यावेळी प्रा. अशोक गायधने यांनी प्रास्ताविक करताना दोनशे वर्षापूर्वी औद्योगिक क्रांतीने पर्यावरणाचा नाश केला असून पुन्हा आपल्याला 33टक्के जंगलाकडे वाटचाल करावी लागणार असे प्रतिपादन केले.अध्यक्षपदावरून मार्गदर्शन करताना ज्येष्ठ नागरिक व सामाजिक कार्यकर्ते भैय्याजी बावनकुळे यांनी सर्वांनी पर्यावरणाबद्दल सजग राहण्याचे आवाहन केले.



यानंतर अमर जवान शहीद कृषी फॉर्म येथे तसेच भारतीय जनता युवा मोर्चा तालुका अध्यक्ष आदित्य बांते यांच्या नेतृत्वाखाली व ग्रीन नेचर फाउंडेशन लाखनी यांच्या सहकार्याने लाखनी येथील सोमलवाडा रोडवर विविध वृक्ष प्रजातीचे वृक्षारोपण एक पेड माँ के नाम अंतर्गत करण्यात आले.

वृक्षरोपणासाठी लाखनी पोलिस स्टेशनचे माजी पोलिस निरीक्षक व सध्या यवतमाळ येथे निवासी असलेले जे. बी. जोहरे, बंगलोर येथील निवासी प्रकाशभाई यांनी आपले वडील स्व.मधुसूदन भैय्या यांचे स्मृतिप्रित्यर्थ त्याचप्रमाणे नागपूर निवासी प्रशांत कळनावत यांनी वडील स्व. वामनराव कळनावत यांचे स्मृतिप्रित्यर्थ व भैय्याजी कृषक सेवालय केंद्र लाखनी यांचे मालक पवन भैय्याजी बावनकुळे यांनी आपले मातोश्री स्व. पुष्पाबाई बावनकुळे यांचे स्मृतिप्रित्यर्थ वृक्षारोपण करिता झाडे व वृक्ष संरक्षक कठडे पुरविले त्याबद्दल त्यांचे विशेष आभार यावेळी मानण्यात आले.त्याचप्रकारे ग्रीन नेचर फाउंडेशनचे हितचिंतक व कोनगाव पोलिस स्टेशन मुंबईचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा पोलिस उपायुक्त भिवंडी यांनी मदर डेअरी फॉर्मच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने विविध प्रजातीचे वृक्षारोपण केले त्यांचेही यावेळी विशेष अभिनंदन करण्यात आले.

कार्यक्रमाला लाखनी वनक्षेत्रचे वनक्षेत्राधिकारी अंकुश धनविजय, अमर जवान शहीद कृषी फॉर्मचे संस्थापक सेवानिवृत्त मेजर ऋषी वंजारी,ग्रीन नेचर फाउंडेशनचे कार्यकर्ते वंश फंदे, लक्की चांदेवार, अध्यक्ष अशोक वैद्य, आर आर टी सदस्य व सर्पमित्र सलाम बेग मिर्झा, सरीसृप संशोधक विवेक बावनकुळे, सर्प व निसर्गमित्र पंकज भिवगडे व नितीन निर्वाण यांनी कार्यक्रमासाठी अथक परिश्रम घेतले.

# अंधेरीतील रेस्टॉरंट प्रकरण चर्चेत; कारवाई न झाल्याचा सामाजिक कार्यकर्त्याचा आरोप

**दैनिक युवक आधार**

**मुंबई किशोर गुडेकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख** : अंधेरी (पूर्व) येथील एका रेस्टॉरंट संदर्भात करण्यात आलेल्या तक्रारींवर अद्याप ठोस कारवाई न झाल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते आकाश अशोक गुप्ता यांनी केला आहे. या प्रकरणी त्यांनी मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई पोलीस, मुंबई महानगरपालिका, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ACB) तसेच इतर संबंधित शासकीय विभागांकडे तक्रारी व स्मरणपत्रे सादर केली आहेत.

आकाश गुप्ता यांनी आपल्या तक्रारीत अंधेरी (पूर्व) येथील आझाद नगर परिसरातील "अपना मुंबई बाईट" नावाच्या रेस्टॉरंटबाबत विविध मुद्दे उपस्थित केले आहेत. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, संबंधित ठिकाणी आवश्यक परवानग्यांबाबत शंका असून अनेक वेळा लेखी तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.




या प्रकरणात माहिती अधिकार अधिनियमांतर्गत मागविण्यात आलेल्या माहितीनुसार अंधेरी पोलीस ठाण्याने दिलेल्या उत्तरात मागितलेली बहुतांश माहिती पोलीस विभागाशी संबंधित नसल्याचे नमूद केले आहे. तसेच संबंधित रेस्टॉरंटकडे असलेल्या परवानग्या, लायसन्स किंवा त्यासंबंधीची माहिती पोलीस विभागाकडे उपलब्ध नसल्याचे उत्तरात स्पष्ट करण्यात आले आहे.

माहिती अधिकारातून मिळालेल्या उत्तरानुसार, मागील दोन वर्षांत संबंधित आस्थापनाविरोधात कोणतीही कारवाई झाल्याची नोंद उपलब्ध नसल्याचेही सांगण्यात आले आहे. तसेच परिसरातील ध्वनीप्रदूषण किंवा सार्वजनिक त्रासासंदर्भातील कोणतीही अधिकृत नोंद उपलब्ध नसल्याचे उत्तरात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, तक्रारदार आकाश गुप्ता यांनी काही अधिकारी व संबंधित आस्थापनामध्ये संगनमत असल्याचा संशय व्यक्त केला असून या संदर्भात स्वतंत्र चौकशीची मागणी केली आहे. तसेच स्वतःच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करत आवश्यक संरक्षण देण्याची मागणीही त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

या संदर्भातील आरोप व दावे हे तक्रारदाराने केलेले असून त्यांची अधिकृत चौकशी अथवा पुष्टी अद्याप झालेली नाही. संबंधित विभागांची अंतिम भूमिका आणि चौकशी अहवाल अद्याप समोर आलेला नाही.

या प्रकरणामुळे संबंधित तक्रारींवर पुढे कोणती कारवाई होते, तसेच महानगरपालिका व इतर शासकीय विभागांकडून कोणती माहिती समोर येते याकडे स्थानिक नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# सायकल चालवा, पर्यावरण वाचवा; निफाड पोलिसांच्या सायकल रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : जागतिक सायकल दिनाचे औचित्य साधत निफाड पोलिस स्टेशनच्या वतीने रविवारी आयोजित करण्यात आलेल्या 'संडे ऑन सायकल' या जनजागृती मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पर्यावरण संवर्धन, आरोग्य जागरूकता आणि इंधन बचतीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या सायकल रॅलीत पोलिस अधिकारी, कर्मचारी तसेच निफाड सायकलिस्ट ग्रुपचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

रविवारी पहाटे ६ वाजता निफाड पोलिस स्टेशनच्या आवारातून पोलिस निरीक्षक गणेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली सायकल रॅलीला प्रारंभ झाला. यावेळी पोलिस हवालदार दीपक ढिकले, पोलीस हवालदार कपालेश्वर ढिकले, नाईक नितीन सांगळे, पोलीस कॉन्स्टेबल अरविंद ढवळे, सागर जाधव, धनंजय जाधव, सिद्धार्थ वाघ, नवनाथ सूर्यवंशी, विक्रम लहाने, योगेश आव्हाड आणि स्वप्नील शिरसाठ यांच्यासह अनेक पोलिस कर्मचारी सहभागी झाले होते.




तसेच निफाड सायकलिस्ट ग्रुपचे प्रविण तनपुरे, पांडुरंग कडवे, संदीप गवळी, दीपक घंगाळे, राजू गवळे, रामनाथ शिंदे, विलास धारराव, योगेश निफाडे, अशोक कोल्हे, ओंकार घंगाळे, अथर्व नकाते, सूरज बागडे, तुषार कोल्हे, राम बोरसे, महेंद्र क्षीरसागर, संजय तळेकर, पूजा मगर, मनीषा वाघ आदी सायकलप्रेमींनी उत्साहाने सहभाग नोंदविला.

निफाड–शिवडी– निफाड असा निर्धारित मार्ग पूर्ण करत सायकलस्वारांनी पर्यावरण संरक्षण, आरोग्य संवर्धन आणि इंधन बचतीचा प्रभावी संदेश दिला. रॅलीदरम्यान "सायकल चालवा, पर्यावरण वाचवा" अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. सायकल हा केवळ व्यायामाचा उत्तम पर्याय नसून प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक वाहतुकीचे प्रभावी साधन असल्याचे यावेळी नागरिकांना पटवून देण्यात आले.

रॅलीदरम्यान सहभागी सायकलस्वारांनी नियमित सायकल वापरामुळे शारीरिक तंदुरुस्ती राखण्यास मदत होते, हृदयविकार आणि मधुमेहासारख्या आजारांपासून संरक्षण मिळते तसेच इंधनावरील खर्चात बचत होते, याविषयीही जनजागृती केली. पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अवलंब करण्यासाठी नागरिकांनी दैनंदिन जीवनात सायकलचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

सायकल रॅलीचा समारोप निफाड पोलिस स्टेशनच्या आवारात करण्यात आला. या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती होण्यास मदत झाली असून नागरिकांमध्ये सायकल वापराबाबत सकारात्मक संदेश पोहोचल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. निफाड पोलिसांनी राबविलेल्या या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक करण्यात आले.

# वय लहान, स्वप्न मोठे! प्रचित भवरने तीन तासांत सर केला हरिश्चंद्रगड

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : "इच्छाशक्ती, जिद्द आणि साहसाची आवड असेल तर वय कधीच आड येत नाही," याचा प्रत्यय नाशिक जिल्ह्यातील एका चार वर्षीय चिमुकल्याने आपल्या कर्तृत्वातून घडवून आणला आहे. निफाड तालुक्यातील शिवडी येथील मूळ रहिवासी व सध्या ओझर येथे वास्तव्यास असलेल्या सचिन भवर यांचा अवघ्या चार वर्षांचा मुलगा प्रचित सचिन भवर याने महाराष्ट्रातील दुर्गम आणि आव्हानात्मक समजल्या जाणाऱ्या हरिश्चंद्रगडाची यशस्वी चढाई अवघ्या तीन तासांत पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

कळसुबाई-हरिश्चंद्रगड अभयारण्य परिसरातील हरिश्चंद्रगड हा त्याच्या उंची, खडतर चढाई आणि निसर्गरम्य पण आव्हानात्मक वाटांसाठी प्रसिद्ध आहे. अनुभवी ट्रेकर्सनाही या गडाची चढाई करताना मोठी कसरत करावी लागते. मात्र, बालवयातच साहसाची आवड जोपासणाऱ्या प्रचितने आपल्या चिमुकल्या पावलांनी हा गड अत्यंत उत्साहाने आणि आत्मविश्वासाने सर करत एक अनोखा विक्रम आपल्या नावावर केला.

गडाच्या चढाईदरम्यान अनेक कठीण टप्पे, चढ-उतार आणि दमछाक करणारे मार्ग पार करताना प्रचितने कुठेही थकव्याची चिन्हे दाखवली नाहीत. उलट प्रत्येक टप्पा पार करताना त्याचा उत्साह अधिकच वाढत गेला. गडाच्या माथ्यावर पोहोचल्यानंतर त्याच्या चेहऱ्यावर झळकणारा आनंद आणि विजयाचा भाव उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.प्रचितच्या या यशामागे त्याच्या पालकांचे मोलाचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन असल्याचे दिसून येते. त्याचे वडील सचिन ज्ञानेश्वर भवर हे विक्रीकर विभागात विक्रीकर निरीक्षक (एसटीआय) म्हणून कार्यरत असून, आई प्रियंका भवर या शिक्षिका आहेत. साहस, शिस्त आणि निसर्गप्रेमाचे संस्कार बालपणापासूनच प्रचितला मिळाल्याने त्याच्यातील धाडसी वृत्ती अधिक बळकट झाली.





**वय लहान असले तरी स्वप्न मोठे असावेत आणि ती पूर्ण करण्यासाठी जिद्द हवी, याचे जिवंत उदाहरण म्हणजे प्रचित भवर. अवघ्या चौथ्या वर्षी त्याने गाठलेले हे शिखर भविष्यातील अनेक यशस्वी मोहिमांची नांदी ठरणार आहे, यात शंका नाही**

अवघ्या चार वर्षांच्या वयात प्रचितने केलेली ही कामगिरी केवळ बालसाहसाचा आदर्श नसून मोठ्यांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे. त्याच्या या यशामुळे निफाड, शिवडी आणि ओझर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध सामाजिक संस्था, शिवप्रेमी, ट्रेकर्स आणि नागरिकांकडून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# महाराष्ट्रातील सातारा, चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाजवळ वसलेले एक आत्मनिर्भर सुंदर गाव

**दैनिक युवक आधार**

**दक्षिण नागपूर डॉ सुनिल भगत :** भारतातील शहरी जीवनाच्या धावपळीपासून दूर, एक असा शांततेचा कोपरा आहे जो जवळजवळ अविश्वसनीय वाटतो. महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाजवळ वसलेले सातारा हे एक सुंदर गाव, ग्रामीण जीवनाबद्दलच्या समजुतींना शांतपणे बदलत आहे.

आता मे महिन्यात बहुजन सौरभ चे शिष्टमंडळ प्रा. संध्या राजूरकर, डॉ सुनिल भगत, देवयानी भगत, सुवर्णा डोंगरे, डॉ महेंद्र भगत, अजय भगत, डॉ विशाखा भगत आणि प्रमिता भगत यांनी ह्या स्मार्ट ग्राम साताऱ्याला भेट दिली.

या भेटीतून असे आढळले की, कधीकधी सर्वात उल्लेखनीय ठिकाणे तीच असतात जी चकचकीत माहितीपत्रकांमध्ये झळकत नाहीत. "पुढच्या वेळी जेव्हा कोणी म्हणेल की भारतीय गावे अस्वच्छ आहेत, तेव्हा त्यांनी या गावाला जरुर भेट द्यायला हवी."

**सातारा**

चंद्रपूरच्या चिमूर तालुक्यात वसलेले सातारा हे महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यातील एक आदर्श आदिवासी गाव असून ते ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनजवळ वसलेले आहे.

•ताडोबाचे सान्निध्य: ताडोबा अभयारण्याच्या अगदी जवळ वसलेले असल्यामुळे, येथे पर्यटक वारंवार भेट देतात आणि ग्रामीण आदिवासींच्या विकासातील हे एक मोठे पर्यावरणीय आणि सामाजिक यशोगाथा ठरले आहे. हे गाव एक आत्मनिर्भर "स्मार्ट गाव" म्हणून मोठ्या प्रमाणावर ओळखले जाते, जेथील कठोर सामुदायिक स्वच्छता, सौर ऊर्जा पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत.आणि महिला सक्षमीकरण यासाठी ते प्रसिद्ध आहे.

सातारा गावात सौरऊर्जा, स्वच्छता, शाश्वत जीवनशैली आणि सामुदायिक भावना यांचा संगम होतो.

**सातारा गावातील प्रमुख वैशिष्ट्ये**

•स्वच्छ परिसर: गावात एकही उघडा गटार किंवा कचऱ्याचे ढिगारे नाहीत. फक्त अभिमान आणि शिस्त आहे. जिथे रस्ते स्वच्छ आहेत. रहिवासी स्वच्छतेची कामे वाटून घेतात आणि लहान मुलेसुद्धा रोजच्या कचरा संकलनात सक्रियपणे सहभागी होतात. गावकरी दररोज पाळीपाळीने संपूर्ण गाव स्वच्छ करतात.

•शाश्वत पायाभूत सुविधा: हे सौर ऊर्जेवर चालणाऱ्या पथदिव्यांवर, घरांसाठीच्या सामायिक सौर वॉटर हीटरवर आणि आरओ वॉटर एटीएम प्रणालीवर चालते. सार्वजनिक सौर हीटरमधून गरम पाणी मोफत मिळते. आरओ वॉटर एटीएम कार्डद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध आहे. प्रत्येक घरात मीटर असलेला नळ आहे, त्यामुळे प्रत्येकजण फक्त वापरलेल्या पाण्याचेच पैसे देतो.

•महिला सक्षमीकरण: समाजाच्या नेतृत्वात आणि अर्थव्यवस्थेत महिला प्रमुख भूमिका बजावतात, महिलांचा अनादर केला जात नाही; त्या नेतृत्व करतात. तसेच त्यापैकी अनेक जणी जवळच्या ताडोबा टायगर सफारीमध्ये सफारी मार्गदर्शक गाइड म्हणून काम करतात.
















•सामुदायिक वैशिष्ट्ये: वैशिष्ट्यांमध्ये मुलांसाठी ग्रंथालय, ज्येष्ठ नागरिकांसाठी एकत्र येण्याचे ठिकाण आणि सामुदायिक शिस्त राखण्यासाठी कडक नियम यांचा समावेश आहे. या गावात शिवीगाळ केल्यास ५०० रुपये दंड लागतो.

•रस्त्यावरील दिवे सौर ऊर्जेवर चालतात आणि ते रात्री आपोआप लागतात.

•ज्येष्ठ नागरिकांसाठी एक बसण्याची जागा आहे जिथे ते आराम करू शकतात, टीव्ही पाहू शकतात आणि गप्पा मारू शकतात.

•पावसाचे पाणी साठवणे आणि खतनिर्मिती करतात, आणि आजूबाजूला एकही उघडे शौचालय दिसत नाही. अगदी गुरांच्या गोठ्यांमध्येही दुर्गंधी येत नाही.

रहिवाशांच्या नावांनी सूर छेडणारे आणि ऑनलाइन सोशल मीडिया ची मने जिंकणारे भारतातील 'शिट्टी वाजवणारे गाव'

"तुम्ही इथे जे काही पाहता ते सर्व समाजानेच उभारले आहे. पैसा, श्रम आणि वेळ, हे सर्व गावकऱ्यांनी स्वतःच दिले आहे.

**सातारा ची लोक वस्ती**

घर असलेल्या गावात ४००-५०० लोकवस्ती आहे. सर्व साधारण असलेल्या गावातील लोंकामध्ये सर्व धर्माची लोक गुणगोविंदाने राहतात. विशेष म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ह्या परिसरात आपल्या जीवनातील बराच मोठा काळ घालवला असल्याने येथे जनमानसावर त्यांचा प्रचंड प्रभाव येथे आढळतो. चौकामध्ये रोज सकाळी आणि संध्याकाळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे गीत आणि प्रार्थना होत असते. घरोघरी भेट दिल्यावर असे दिसून आले की प्रत्येक घरात सर्वसाधारणतः बेताची परिस्थिती आहे. संध्याकाळच्या जेवणात विशेषता बेसन, डाळ आणि भात किंवा पोळयाचा समावेश असतो.

**सातारा स्मार्ट गावचे प्रेरणा स्त्रोत**

गजानन नावाचे साताराचे ग्रामस्थ अंदाजे १०-१५ वर्षापूर्वी ही कल्पना मांडली आणि गावात "हे सर्व आखायला आणि सर्वांना अशा प्रकारे जगण्यासाठी राजी करायला गजानन यांना अंदाजे पाच वर्षे लागली. आणि आज हे सर्वांच्या कष्टाचे फळ म्हणून सुंदर असे स्वप्नातील गाव बनले आहे. महाराष्ट्रातील गावे किती अप्रतिम आहेत हे सर्व एका गजानन यांच्या यथा शक्तीतून सातारा गाव साकारल्या गेले आहे.

**सातारा गावाची प्रशंसा**

आनंद महिंद्रा उद्योगपती यांनी सातारा गावाची प्रशंसा करत जनतेला आव्हान केले की यांनी महाराष्ट्रातील या स्वच्छ आणि शाश्वत अशा गावाचा शोध घ्यावा.येथील सामुदायिक नेतृत्वाखालील परिवर्तन आणि पर्यटकांना हे गाव का आवडते, हे जाणून घ्यावे.बहुजन सौरभ च्या चमूने ह्या ठिकाणी मे महिन्यात जाऊन भेट दिली आणि सर्वजण अत्यंत प्रभावित केले.संध्या राजूरकर म्हणतात "हे अप्रतिम आहे! इतर गावांनी अनुकरण करण्यासाठी हे एक आदर्श गाव आहे. किती अविश्वसनीय प्रेरणादायी आहे. हे इतक्या सुंदरपणे गाव तयार केल्याबद्दल करणाऱ्या ग्रामस्थांचे कौतुक आणि खूप खूप अभिनंदन आणि धन्यवाद. मला कधीतरी या गावाला नक्कीच राहायला आवडेल."

डॉ सुनिल भगत म्हणतात, "हे खूपच छान आहे. जेव्हा लोक मनापासून प्रयत्न करतात, तेव्हा आश्चर्यकारक गोष्टी घडतात." "स्वच्छ, सुव्यवस्थित आणि प्रेरणादायी गावे नक्कीच आजूबाजूच्या लोकांना प्रेरणा देतील ज्यामुळे पर्यटनाला नक्कीच चालना मिळेल,"

देवयानी भगत आणि सुवर्णा डोंगरे यांनी"गजानन ह्यांच्या कार्याला सलाम केला आणि त्यांच्या संयम आणि इतर ग्रामस्थ त्यांची समजूत घालून हे शक्य केल्याबद्दल त्यांना खूप खूप आदर वाटतो." असे उद्गार काढलेत.

डॉ महेंद्र भगत, अजय भगत आणि डॉ विशाखा भगत यांनी "शहरांनीही याचे अनुकरण करावे अशी आमची इच्छा आहे," अशी आणखी एक टिप्पणी केली.

**सातारा गावाला भेट कशी द्यावी**

सातारा गावात पोहोचण्यासाठी, तुम्हाला आधी नागपूर -ताडोबा-अंधारी व्याघ्र अभयारण्यात १०६-१४० किमी प्रवास करावा लागेल. चंद्रपूर जंक्शनवरून किंवा उद्यानाच्या प्रवेशद्वारापासून सुमारे ३७ किमी अंतरावर असलेल्या सातारा गावाला टॅक्सी किंवा बसने भेट देऊ शकता.वन्यजीव अभयारण्य फिरून झाल्यावर, तुम्ही मार्गदर्शक किंवा चालकाच्या मदतीने या गावाकडे प्रवासाला निघू शकता.तर आपण ह्या सातारा स्मार्ट ग्राम ला नक्की भेट द्या.

# नागपुरात क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी दर्जेदार पायाभूत सुविधांवर भर – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

खासदार क्रीडा महोत्सवाची सांगता

नागपूर, दि. ७: नागपुरात व्यापक स्तरावर क्रीडा क्षेत्रातील पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात येत आहे. या सोयी-सुविधांमुळे क्रीडा क्षेत्रात मनुष्यबळ तयार होण्यास मोठ्या प्रमाणात चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला.

नागपुरात आयोजित आठडाभराच्या खासदार क्रीडा महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. कविवर्य सुरेश भट सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके, आमदार संजय भेंडे, नवनिर्वाचित आमदार अरुण लखानी, महापौर नीता ठाकरे, क्रीडा महोत्सव आयोजन समितीचे अध्यक्ष संदीप जोशी, माजी खासदार डॉ. विकास महात्मे आदी मान्यवर उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी आयोजित होत असलेल्या क्रीडा महोत्सवाचा प्रतिसाद सातत्याने वाढत असून अनेक खेळाडूंना यानिमित्ताने संधी आणि प्रशिक्षण उपलब्ध होत आहेत. या माध्यमातून नागपुरात एक क्रीडा संस्कृती आकारास येत आहे. क्रीडा क्षेत्र हे सातत्याने बदलत असून अभ्यासासोबतच आता क्रीडा क्षेत्रात नैपुण्य मिळविण्यावरही मोठा भर दिला जात आहे. या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात व्यावसायिकता आली आहे. त्यामुळे खेळाडूंना वेगवेगळ्या क्षेत्रातील दालने उपलब्ध झाली आहेत. खेळ ही अशी संस्कृती आहे ज्यामुळे युवा पीढी योग्य दिशेने वाटचाल करू शकते. त्यातून स्पर्धात्मक वृत्ती देखील तयार होत असल्याकडे मुख्यमंत्री फडणवीस यांनी लक्ष वेधले.

नागपुरात क्रीडा संस्कृतीला आणखी चालना देण्यासाठी दर्जेदार पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत. देशातील अत्यंत आधुनिक असे क्रीडा संकुल मानकापुरात तयार होत आहे. यानिमित्ताने येथे जागतिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन देखील करता येईल. क्रीडा विद्यापीठ देखील तयार होत आहे. एकूणच या सोयीसुविधांमुळे क्रीडा क्षेत्रात मनुष्यबळ तयार








होण्यास मदत होणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

**आगामी खासदार क्रीडा महोत्सव विदर्भस्तरीय – केंद्रीय मंत्री नितीन गडकरी**

आगामी खासदार महोत्सवाचे आयोजन व्यापक स्तरावर म्हणजेच विदर्भस्तरावर केले जाईल. त्यात एक लाखावर खेळाडू सहभागी होतील असे प्रयत्न केले जातील, अशी घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली.

नागपूर हे क्रीडा राजधानी म्हणून उदयास यावे, यासाठी शहरातील क्रीडा सुविधा मोठ्या प्रमाणात उभारण्यात येत आहेत. शहरात किमान 25 जलतरण तलाव तयार व्हावेत, असे आपले प्रयत्न आहेत. शहराच्या सर्वच भागात क्रीडा सुविधांची उभारणी होणार असून शहरातील किमान एक लाख मुले-मुली सायंकाळी क्रीडा मैदानावर दिसावीत, असे आमचे स्वप्न असल्याचे केंद्रीय मंत्री गडकरी यांनी यावेळी सांगितले.

**आगामी दहा वर्षात क्रीडा क्षेत्राला मोठी गती मिळणार – केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे**

देशभरात एक उद्दिष्ट घेऊन क्रीडा क्षेत्रात काम सुरू आहे. 2036 मध्ये भारतात ऑलिम्पिकचे आयोजन व्हावे, यासाठी प्रयत्न सुरू आहेत व त्यासाठी मोठ्या प्रमाणात क्रीडा क्षेत्रातील संसाधने वाढविण्यावर भर दिला जात आहे, असे प्रतिपादन क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी केले.

हा केवळ आठ दिवसाचा महोत्सव नसून क्रीडा क्षेत्रातील भविष्यासाठी ही स्पर्धा महत्त्वाची आहे. अनेक क्रीडा प्रकारात महाराष्ट्र आघाडीवर असून हे चित्र नक्कीच सुखावणारे आहे. देशांतर्गत विविध क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्र पहिल्या तीनमध्ये दिसून येतो, ही अभिमानाची बाब आहे. क्रीडा क्षेत्रात अनेक रोजगारांच्या संधीही उपलब्ध झाल्याचे असल्याचे त्या म्हणाल्या.

**जिल्ह्याच्या क्रीडा विकासासाठी 45 कोटींची तरतूद – पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

नागपूर जिल्ह्यातील क्रीडा सुविधांसाठी सुमारे 45 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्यादृष्टीने नियोजन करण्यात येत असल्याची माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी बोलताना दिली. खासदार क्रीडा स्पर्धांच्या यशस्वी आयोजनाबद्दल त्यांनी आयोजक समितीचे अभिनंदन केले.

**'खासदार क्रीडा भूषण पुरस्कार'14 खेळाडूंना प्रदान**

विविध क्रीडा प्रकारांतील १४ खेळाडूंना 'खासदार क्रीडा भूषण पुरस्कार तसेच विशेष पुरस्कार प्रदान मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. विजेते असे...

व्हॉलीबॉल : कर्मण्य चिलकुलवार
ॲथलेटिक्स : अंजली मडावी
खो-खो : सिद्धेश सातपुते
सॉफ्टबॉल : उर्वशी सनेश्वर
हँडबॉल : हरप्रीतसिंग रंधावा
कबड्डी : मंगला ढबाले
स्केटिंग : अदिती धांडे
बुद्धिबळ : श्रद्धा बजाज
कुस्ती : नंदिनी साहू
बॅडमिंटन : निशिका गोखे
योगासन : भरत डेलिकर
बास्केटबॉल : गुंजन मंत्री
जिम्नॅस्टिक : अवनी राठोड
जलतरण : अदित्री पयासी

यंदा काही विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात उत्कृष्ट संघटक पुरस्कार विजय डांगरे यांना तर उत्कृष्ट प्रशिक्षक पुरस्कार रवींद्र टोंग यांना तसेच क्रीडा सेवक पुरस्कार उमेश नायडू आणि उत्कृष्ट क्रीडा मंडळ म्हणून यंग मुस्लिम फुटबॉल क्लब यांना गौरविण्यात आले.

## कर्तृत्व, संस्कार आणि सेवाभावाची गाथा

# कै. गोपीनाथ बाबुराव फसले : एक प्रेरणादायी जीवनप्रवास



कुटुंब, समाज आणि गावाच्या जडणघडणीत काही व्यक्तींचे योगदान इतके मोठे असते की त्यांची अनुपस्थिती अनेक वर्षे जाणवत राहते. अशी माणसे केवळ स्वतःचे आयुष्य जगत नाहीत, तर अनेकांच्या जीवनाला दिशा देत असतात. त्यांचे विचार, कार्य आणि वागणूक समाजासाठी प्रेरणास्थान ठरतात. दौलावडगावच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक जीवनात असेच एक आदरणीय व्यक्तिमत्त्व म्हणजे कै. गोपीनाथ बाबुराव फसले.

दि. ३० मे २०२६ रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले आणि एका युगाचा अंत झाला. त्यांच्या जाण्याने केवळ फसले परिवारांचे नव्हे तर संपूर्ण दौलावडगाव परिसरांचे मोठे नुकसान झाले आहे. समाजाला योगय दिशा देणारा, प्रत्येकाला आपलेसे करणारा आणि गावांच्या एकात्मतेसाठी आयुष्यभर झटणारा एक ज्येष्ठ मार्गदर्शक काळाच्या पडद्याआड गेला.

कै. गोपीनाथ बाबुराव फसले यांचा जन्म १४ नोव्हेंबर १९३९ रोजी दौलावडगाव, ता. आष्टी येथे झाला. त्यांचा जन्म झाला तो काळ अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा होता. मराठवाड्याचा हा भाग निजामशाहींच्या अधिपत्याखाली असल्यामुळे शिक्षणाच्या सुविधा अत्यल्प होत्या. गावामध्ये शाळाच उपलब्ध नव्हती. त्यामुळे पहिली ते चौथीपर्यंतचे शिक्षण त्यांनी त्यावेळी ब्रिटिश राजवटीत असलेल्या भातोडी येथे पूर्ण केले. त्यानंतर पाचवी ते आठवीपर्यंतचे शिक्षणण चिचोंडी पाटील येथे आणि नववी ते अकरावीपर्यंतचे शिक्षण अहिल्यानगर येथे घेतले.

आजच्या काळात शिक्षण सहज उपलब्ध असले तरी त्या काळातील परिस्थिती अत्यंत वेगळी होती. वाहतुकींची साधने नव्हती, आर्थिक परिस्थिती हलाखीची होती, समाजात शिक्षणाविष्यी जागरूकता नव्हती. अशा परिस्थितीत ग्रामीण भागातील एका सामान्य कुटुंबातील मुलांने अकरावीपर्यंत शिक्षण पूर्ण करणे ही मोठी गोष्ट होती. यावरून त्यांच्या कुटुंबातील शिक्षणाविष्यीची जिद्द आणि दूरदृष्टी स्पष्ट होते.

त्यांचे बालपण अनेक संकटांमध्ये गेले. अठराविश्व दारिद्र्य, साथीचे रोग, दुष्काळ आणि रजाकारांच्या अत्याचारांनी समाज अस्थिर झाला होता. अशा काळात जीवनाशी संघर्ष करत त्यांनी स्वतःला घडवले. नियतीने आणखी एक मोठा आघात केला तो म्हणजे वयांच्या अवघ्या सोळाव्या वर्षी वडिलांचे निधन झाले. या घटनेनंतर त्यांच्या खांद्यावर संपूर्ण कुटुंबाची आणि गावच्या वंशपरंपरागत पाटीलकींची जबाबदारी आली.

फसले घराण्यातील अनेक पिढ्यांपासून चालत आलेला पाटीलकींचा वारसा त्यांना लाभला होता. त्यांच्या पुर्वजां पैकी बजरंग पाटील हे निजामकालीन पाटील म्हणून ओळखले जात होते. हा वारसा त्यांनी पुढे चालविला; परंतु पाटीलकीचा गर्व किंवा अधिकारांचा आव्व त्यांनी कधीही दाखविला नाही. उलट सर्व समाजाला बरोबर घेऊन, प्रत्येकाला समान वागणूक देऊन त्यांनी नेतृत्व केले.

त्यांनी अनेक प्रश्न गावातच शांततेने मिटवले. त्यामुळे गावातील लोकांचा न्यायव्यवस्थेवरील आणि सामाजिक सलोख्यावरील विश्वास अधिक दृढ झाला. पोलिस प्रशासन आणि ग्रामस्थ यांच्यात समन्वय राखण्यातही त्यांचे मोठे योगदान होते.

त्यांनी कधीही पक्षीय राजकारणाला प्राधान्य दिले नाही. प्रादेशिक आणि राष्ट्रीय राजकारणापासून अलिप्त राहून त्यांनी गावांच्या एकात्मतेसाठी आणि विकासासाठी काम केले. त्यांच्यासाठी पक्षापेक्षा गाव मोठे आणि समाजहित सर्वश्रेष्ठ होते. विविध जाती-धर्मातील लोकांमध्ये परस्पर विश्वास, प्रेम आणि बंधुभाव निर्माण करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले.

शब्दांकन
**प्रा. मधुकर दहातोंडे**
सालेवडगाव
ता. आष्टी, जि. बीड

गावातील गरीब, अनाथ, वंचित आणि गरजू लोकांच्या मदतीसाठी ते सदैव तत्पर असत. शासकीय योजनांची माहिती देणे, गरजूंना योगय ठिकाणी मार्गदर्शन करणे आणि त्यांना मदत मिळवून देणे हे त्यांचे नियमित कार्य होते. अनेक कुटुंबांना त्यांनी संकटातून बाहेर काढले. अनेक युवकांना नोकरी आणि शिक्षणाच्या संधी मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

माझा त्यांच्याशी संबंध १९८७-८८ च्या सुमारास आला. त्या वेळेपासून त्यांनी मला कधीही परकेपणाची जाणीव होऊ दिली नाही. त्यांच्या शांत स्वभावातून उमटणारे आपुलकींचे शब्द मनाला स्पर्श करून जात असत. त्यांचा सहवास म्हणजे जणू अनुभवांचे विद्यापीठ होते.

इतिहास हा त्यांचा अत्यंत आवडीचा विषय होता. स्थानिक इतिहास, मराठा साम्राज्याचा इतिहास, निजामकालीन घटना आणि विविध घराण्यांचा इतिहास यांचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. काही महिन्यांपूर्वीच त्यांनी नागपूरच्या रघुजी भोसले घराण्यापासून शिंगटकरच्या फसले घराण्यापर्यंतचा इतिहास अतिशय अभ्यासपूर्ण पद्धतीने सांगितला होता. त्यांच्या स्मरणशक्तींची आणि इतिहासप्रेमांची ही साक्ष होती.

व्यकिगत जीवनात त्यांनी शिस्त, संयम आणि नियमबद्धता यांना सर्वोच्च स्थान दिले. आहार-विहारावर त्यांचे काटेकोर नियंत्रण होते. साधी राहणी, उच्च विचारसरणी आणि कर्तव्यनिष्ठ जीवन ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वांची ओळख होती.

त्यांचा परिवारही त्यांच्या संस्कारांचा जिवंत वारसा आहे. पत्नी, तीन मुले आणि दोन मुली असा त्यांचा परिवार. मुलांच्या शिक्षणावर त्यांनी विशेष भर दिला. आज त्यांच्या तीन मुलांपैकी दोन पुत्र शिक्षण क्षेत्रात ज्ञानदानांचे पवित्र कार्य करीत आहेत, तर एक पुत्र भारतीय लष्करात देशसेवा करून सन्मानाने निवृत्त झाला आहे. पाच मुलांच्या दहा नातवंडांपैकी नऊ नातवंडे विविध शासकीय सेवांमध्ये कार्यरत आहेत आणि एक नातू शिक्षण घेत आहे. ही यशस्वी परंपरा त्यांच्या दुरदृष्टीची आणि संस्कारक्षम नेतृत्वांचीच फलश्रुती आहे.

स्वतःच्या कुटुंबापुरते मर्यादित न राहता त्यांनी अनेक गरीब कुटुंबांच्या मुलांना शिक्षण आणि नोकरीच्या संधी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. अनेकांच्या जीवनाला आकार देण्यात त्यांचे मोलांचे योगदान आहे. म्हणूनच त्यांचे कार्य केवळ एका कुटुंबापुरते मर्यादित न राहता संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी ठरते.

कौटुंबिक जबाबदाऱ्या, सामाजिक कार्य, गावाचा विकास, सर्वसमावेशक नेतृत्व, शिस्तबद्ध जीवन आणि पुढील पिढयांना दिलेले संस्कार या सर्व क्षेत्रांत त्यांनी उल्लेखनीय यश मिळविले. अशा व्यक्तिमत्त्वांची उणीव समाजाला कायम जाणवत राहते.

दि. ३० मे २०२६ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला आणि आपल्या प्रदीर्घ सामाजिक, कौटुंबिक आणि लोकहिताच्या कार्यातून अंतिम निवृत्ती घेतली. मात्र त्यांचे विचार, त्यांचे संस्कार, त्यांची कार्यपद्धती आणि समाजासाठी जगण्याचा आदर्श कायम स्मरणात राहील.

**त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन.**

**|| भावपूर्ण श्रद्धांजली ! ||**